रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८७ | अंक २९७ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in


# कृषीवल

रायगड, बुधवार, दि. ३ एप्रिल २०२४

किंमत ४ ₹


## खांदेरीवरून परतणारी बोट पलटी

**अलिबाग :** खांदेरी किल्ल्यावरील वेताळाचे दर्शन घेऊन परतणारी बोट पलटी झाली. यामध्ये कोणतीही जिवीतहानी झाली नाही. खवळलेल्या समुद्रातील पाण्यामुळे हा प्रकार घडला असल्याची माहिती समोर येत आहे. अलिबाग तालुक्यातील थळपासून काही अंतरावर खोल समुद्रात खांदेरीचा किल्ला आहे. हा किल्ला पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचा असून या किल्ल्यात वेताळ देवाचे मंदिर आहे. या मंदिरात अनेक भाविक दर्शनासाठी येतात. साखर आक्षीमधील काही तरुण रविवारी ३१ मार्च रोजी बोटीतून वेताळ देवाच्या पान २ वर

## कालव्यात बुडून तरुणाचा मृत्यू

**गोवे-कोलाड :** आंबेवाडी येथील तरुण जयेश जयराम परबळकर (वय ३१) याचा सोमवारी (दि.१) पुई गावाच्या कालव्याच्या वाहत्या पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली. जयेश संभे येथे क्रिकेट बघण्यासाठी जातो, असे सांगून घरातून गेला होता. तो सकाळपर्यंत घरी आला नसल्याने नातेवाईकांनी शोध सुरू केला. याची स्कुटी नं. एम.एच.०६ सीई २८४७ ही पुई गावाच्या हद्दीत असणाऱ्या कालव्याच्या बाजूला उभी असल्याचे लक्षात आले. त्यामुळे नातेवाईकांनी शोधले असता जयेशचा मृतदेह नातेवाईकांना पाण्यात सापडला.

# कमी पटसंख्येच्या शाळांचा होणार 'क्लस्टर'

सुयोग आंग्रे
। रायगड ।

**जिल्ह्यातील कमी पटसंख्येच्या शाळांमधील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता आणि सर्वांगीण विकास यात राहणारी कमतरता हा मुद्दा शालेय शिक्षण विभागाने ऐरणीवर आणला आहे. त्या विद्यार्थ्यांसाठी क्लस्टर शाळेचा प्रयोग राबविला जाणार आहे. रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने जिल्ह्यातील सात तालुक्यांमधील कमी पटसंख्या असणाऱ्या शाळांचे एकत्रीकरण करण्याचा प्रस्ताव शिक्षण आयुक्तांना सादर केला आहे. ८२ शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी ३३ समूह शाळा निर्मितीवर भर दिला जाणार आहे. या समूह शाळांमध्ये कमी पटसंख्येच्या शाळांमधील एक हजार १५९ विद्यार्थ्यांना समाविष्ट करण्यात येणार आहे. या विद्यार्थ्यांना शिक्षणाचे धडे देण्यासाठी १२४ शिक्षकांची नियुक्ती करण्यात येणार आहे.**



- **३३ समूह शाळा निर्मितीवर भर**
- **८२ शाळांचे करणार एकत्रीकरण**
- **शिक्षण आयुक्तांकडे प्रस्ताव सादर**

शैक्षणिक स्पर्धेच्या युगात रायगड जिल्हा परिषदेच्या शाळांनी आपली गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी कंबर कसली आहे. शाळेची पटसंख्या वाढावी, यासाठी शिक्षकांसह लोकप्रतिनिधींनी देखील प्रयत्न केल्याचे सर्वश्रुत आहे. परंतु असे असतानाही खासगी शिक्षण संस्थांच्या शर्यतीत जिल्हा परिषदेच्या शाळा मागे पडल्या आहेत. खासगी शैक्षणिक संस्थांमध्ये आपल्या पान २ वर

> शिक्षणाबरोबरच मुलांचा सर्वांगीण विकास, समाजात मिसळण्याची वृत्ती, सामाजिक भान, खिलाडूवृत्ती आणि परस्परांना समजून घेण्याची कलादेखील विद्यार्थ्यांमध्ये रुजली पाहिजे. परंतु एक-दोन किंवा पाच-दहा पटसंख्येच्या शाळांच्या माध्यमातून ही उद्दिष्टे साध्य करणे कठीण असते. अनेक खेळ आणि क्रीडाविषयक संधी त्यांना उपलब्ध होत नाहीत. म्हणून क्लस्टर शाळांचा प्रयोग राबविण्याचे विचाराधीन आहे. रायगड जिल्हा परिषदेने ८२ शाळांच्या एकत्रीकरणाचा म्हणजेच ३३ समूह शाळा निर्मितीचा प्रस्ताव शिक्षण आयुक्तांकडे सादर केला आहे. अद्याप त्या प्रस्तावावर कोणतेही मार्गदर्शन उपलब्ध झालेले नाही.
>
> - पुनिता गुरव, प्राथमिक शिक्षणाधिकारी रायगड जिल्हा परिषद






**आजचा अग्रलेख**
**लबाडीची हद्द**

# 22 हजार नागरिकांसाठी फक्त 13 टँकर

प्रमोद जाधव
। अलिबाग ।

**करोडो रुपये खर्च करून जिल्ह्यात जलजीवन योजना राबविण्यात आली. मात्र आजही या तीन तालुक्यातील २२ हजार नागरिकांना पाण्याची समस्या भेडसावत आहे. रायगड जिल्ह्यामध्ये अलिबाग, पेण व पनवेल या तीन तालुक्यांमध्ये पाण्याचा दुष्काळ सुरु झाला आहे. नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. ५३ ठिकाणी १३ टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे. त्यात १० गावे व ४३ वाड्यांचा समावेश आहे. रायगड जिल्ह्यात कोट्यवधी रूपयांच्या योजना राबवूनही नागरिकांच्या घशाला पडणारी कोरड मात्र कायम असल्याचे विदारक चित्र पहावयास मिळत आहे.**

**22,265 लोकसंख्या**
**53 गाव/वाड्या**
**3 तालुके**

> **रायगड जिल्ह्यातील ज्या गावे, वाड्यांमध्ये पाणी टंचाई आहे. त्या गावात टँकरद्वारे पाणी देण्याचा प्रयत्न केला जात आहे. जिल्ह्यात जलजीवन मिशन अतंर्गत वेगवेगळ्या योजना राबविण्यात आल्या आहेत. अनेक योजना पूर्णत्वास आहेत. काही योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत.**
>
> **– संजय नार्वेकर, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद**

## अलिबाग,पेण व पनवेल तालुक्याला पाणी टंचाईच्या झळा



रायगड जिल्हा टँकरमुक्त करण्याच्या घोषणा प्रशासनामार्फत वारंवार केल्या जातात. पाणी पुरवठ्याच्या वेगवेगळ्या योजना राबवून गावे, वाड्यांमधील नागरिकांना मुबलक पाणी पुरवठा देण्याचा प्रयत्न जिल्हा परिषदेमार्फत कायमच करण्यात आला आहे. मात्र नव्याचे नऊ दिवस या उक्तीप्रमाणे जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभागाचा कारभार सुरु असल्याचे समोर आले आहे.

केंद्र सरकार पुरस्कृत जलजीवन योजना रायगड जिल्ह्यात राबविण्यात आली. प्रति व्यक्ती ५५ लीटर पाणी प्रमाणे पाणी देण्याचा प्रयत्न करण्यात आला. रायगड जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागामार्फत या योजनेची अंमलबजावणी करण्यात आली. पाण्याचे स्त्रोत शोधून त्याद्वारे गावांतील नागरिकांना पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केला. अनेक गावांमध्ये योजना राबवून पान २ वर



# वरंध घाट बंद

## अप्पर जिल्हा दंडाधिकारी संदेश शिर्के यांचे आदेश

**। वरंध । वार्ताहर ।**

महाड-वरंध-भोर मार्गे पुणे या मार्गावर सध्या राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून रस्ता रुंदीकरणाची व संरक्षक भिंत बांधण्याची कामे प्रगतीपथावर आहेत. त्यामुळे या मार्गावरील सर्व प्रकारची वाहतूक १ एप्रिलपासून ३१ मेपर्यंत बंद ठेवण्यात यावी, असे आदेश रायगडचे अप्पर जिल्हा दंडाधिकारी संदेश शिर्के यांनी दिले आहेत. या संदर्भात प्राप्त झालेल्या माहितीनुसार, वरंध घाटातील अने कामे प्रस्तावित असून रस्त्याच्या दुपदरीकरणाचे काम, संरक्षक भिंत बांधण्याची आवश्यकता, सुरक्षा उपाय करण्याची कामे प्रगतीपथावर असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. सद्यस्थितीत वरंधगाव ते रायगड जिल्हा हद्दीमध्ये संरक्षण भिंतीचे काम प्रगतीत असून बहुतांश काम पूर्ण झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र साखळी क्रमांक ९४ पारमाची वाडी ते ९६ (रायगड जिल्हा हद्द) या अंतरामध्ये कामे सुरू करायची असल्याने सदरच्या अंतरामध्ये खोल दरी व उंच डोंगर असून रस्त्याची रुंदी काम करण्यास अपुरी आहे. या अंतरामध्ये चालू वाहतुकीत काम करताना अपघात होण्याची शक्यता असल्याचे नमूद करून पान २ वर

**वेधक**

## उंदीर चावल्यामुळे रुग्णाचा मृत्यू

**पुणे :** पुण्यातील ससून रुग्णालयात आयसीयूमध्ये उपचार घेत असलेल्या तरुणाचा उंदीर चावल्यामुळे मृत्यू झाला. सागर रेणूसे (३०) असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. सागर रेणूसे याचा पुण्यातील भोर तालुक्यात अपघात झाला होता. त्यानंतर त्याला १६ मार्चला ससून रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आलं होतं. २६ मार्चला त्याची प्रकृती खालावत होती. त्यानंतर नेमकं काय झालं याचा शोध घेतला असता. उंदीर चावल्याचे समोर आले. आयसीयुमध्ये त्याच्या डोक्याला, कानाला आणि इतर अवयवांना उंदराने चावा घेतला. त्यानंतर या तरुणाची प्रकृती खालावत जाऊन त्याचे निधन झाले.

## वंचितला निरनिराळी निवडणूक चिन्हे

**मुंबई :** येत्या १९ एप्रिल रोजी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदानासाठी वंचित बहुजन आघाडीला निरनिराळे निवडणूक चिन्ह देण्यात आले आहे. निवडणूक आयोगाने सोमवारी पहिल्या टप्प्यातील निवडणुकीसाठी उमेदवार आणि त्यांना वितरित झालेल्या निवडणूक चिन्हांची माहिती दिली. त्यानुसार वंचित बहुजन आघाडीला रामटेक आणि गडचिरोली -चिमूर लोकसभा मतदारसंघात गॅस सिलिंडर, भंडारा लोकसभा मतदारसंघात उसाची मोळी घेतलेला शेतकरी तर चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात रोड रोलर हे निवडणूक चिन्ह मिळाले आहे.

### कुलाबा-रायगड लोकसभा मतदारसंघात १७ लढती

# सहा वेळा शेकापची बाजी

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**




सुरुवातीचा कुलाबा आणि आताच्या रायगड लोकसभा मतदारसंघासाठी आजपर्यंत १७ वेळा लढत झाली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने शेकाप आणि काँग्रेस या पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांमध्येच सलग १४ वेळा लढत झाली असून त्यामध्ये आठ वेळा काँग्रेस आणि सहा वेळा शेकापचा उमेदवार विजयी झाला आहे. २००९ आणि २०१४ साली शिवसेनेकडे असणारा हा मतदारसंघ २०१९ साली राष्ट्रवादी काँग्रेसने शेकापच्या मदतीने आपल्याकडे घेतला होता.

रायगड जिल्ह्यामध्ये सुरुवातीला शेकाप आणि काँग्रेस असे दोनच प्रमुख पक्ष होते. त्यांच्यामध्येच तुल्यबळ लढत झाली आहे. या कालावधीत प्रत्येक कार्यकर्ता हा आपापल्या पक्षासाठी कायम तत्पर होता. १९५२ साली झालेल्या पहिल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे सी.डी.देशमुख (१,१२,८२३) निवडून आले होते. देशमुख हे देशाचे पहिले अर्थमंत्री होते. त्यांनी शेकापचे राजाराम राऊत (७०,७८५) यांचा पराभव केला होता. १९५७ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत शेकापने मागील पराभवाचे उट्टे काढले होते. शेकापचे राजाराम राऊत (१,२१,०३३) यांनी काँग्रेसच्या दत्तात्रेय कुंटे (५७,५५८) यांचा पराभव केला होता.

१९६२ साली काँग्रेसचे भास्कर दिघे (९८,६८०) विजयी झाले, त्यांनी शेकापचे राजाराम राऊत (६९,६३८) यांना पराभूत केले होते. १९६७ साली झालेल्या निवडणूकीत शेकापचे डि.के.कुंटे (१,६४,४६८) यांनी काँग्रेसचे व्ही.एस. रणदिवे (१,२९,६५६) यांना पराभवाची चव चाखायला लावली होती. १९७१ साली काँग्रेसचे शंकर सावंत (१,२८,०८२) विजयी झाले होते. त्यांनी शेकापच्या दत्ता पाटील (८१,८८३) यांचा पराभव केला होता. १९७७ साली शेकापचे दिनकर पाटील (१,९९,४६३) यांनी काँग्रेसच्या शंकर सावंताचा (१,४६,१४२) पराभव केला. १९८० साली अे.टी. पाटील हे काँग्रेसच्या तिकीटावर लढले होते. पाटील यांनी १,६०,५२४ विजयी मते मिळवली होती. त्यावेळी शेकापच्या दिनकर पाटील यांना १,११,१०४ मते मिळाली होती.

दत्ता खानविलकर हे जनता पार्टीकडून निवडणुकीत उभे होते. त्यांना ८७,६१४ मते मिळाली होती. १९८४ साली शेकापचे डि.बी. पाटील यांना २,११,१९४ मते मिळाली होती, तर काँग्रेसचे अंतुले यांनी काँग्रेसबरोबर फारकत घेत तराजु या चिन्हावर अपक्ष निवडणूक लढवली होती. पान २ वर

## पृथ्वीराज चव्हाण, बाळासाहेब थोरात यांच्याकडून पाटील कुटूंबियांचे सांत्वन





● काँग्रेसचे नेते तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण आणि माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी पेझारी येथील सुशीला सदन निवासस्थानी जाऊन माजी राज्यमंत्री मीनाक्षीताई पाटील यांना श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर शेकापचे आ. जयंत पाटील, माजी आ. पंडित पाटील, अलिबाग अर्बन बँकेच्या अध्यक्षा सुप्रिया पाटील, राजिपच्या माजी सदस्या भावना पाटील, राजिपचे माजी उपाध्यक्ष ॲड. आस्वाद पाटील, माजी अर्थ व बांधकाम सभापती चित्रा पाटील, शेतकरी कामगार पक्षाच्या महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, युवा नेते सवाई पाटील, सुमना पाटील यांची भेट घेऊन सांत्वन केले. ● संबंधित वृत्त पान ३ वर

## महिलेचा खून करणारा अटकेत

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेलमधील भिंगारी गावातील निर्जनस्थळी सहा महिन्यापूर्वी महिलेचा गळा दाबुन खून करून पळून गेलेल्या अज्ञात आरोपीला मध्यवर्ती कक्ष, गुन्हेशाखा नवी मुंबई यांनी अटक केली आहे. पांडव गोरख जाधव उर्फ पांड्या (वय २१ वर्षे रा. मालधक्का झोपडपट्टी पनवेल) असे या आरोपीचे नाव आहे. भिंगारी गावच्या निर्जनस्थळी १० ऑक्टोबर २०२३ रोजी एका महिलेचा खून झाल्याने पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस पथकाने तपास सुरु केला होता. तांत्रिक तपास व पान २ वर

## संजय सिंह यांना जामीन मंजूर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**


आम आदमी पक्षाचे नेते आणि राज्यसभेचे खासदार संजय सिंह यांना ऑक्टोबर २०२३ मध्ये मनी लाँडरिंग प्रकरणी ईडीने अटक केली होती. हे प्रकरण दिल्लीतील मागे घेतलेल्या अबकारी धोरणाशी संबंधित होते. ईडीने संजय सिंह यांच्या जामीनाला विरोध केला नाही, त्यामुळे न्यायालयाने सिंह यांचा जामीन मंजूर केला. संजय सिंह यांच्या व्यतिरिक्त आपचे तीन नेते तिहार तुरुंगात आहेत. माजी मंत्री सत्येंद्र जैन, माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया आणि मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे सध्या तिहार तुरुंगात आहेत.

४ ऑक्टोबर रोजी संजय सिंह यांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले होते. १० तास चौकशी केल्यानंतर त्यांना अटक करण्यात आले. दिल्लीत नव्या अबकारी धोरणाची अंमलबजावणी करण्यात संजय सिंह यांनी महत्त्वाची भूमिका पान २ वर

### रायगडला मिळाल्या सात हजार बाटल्या

# बोटावर लागणारी शाई झाली ६२ वर्षांची

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**



निवडणूक प्रक्रियेमध्ये मतदान झाल्यानंतर मतदारांच्या हाताच्या बोटाला शाई लावली जाते. त्यामुळे दुबार मतदान तसेच बोगस मतदानाला आळा बसण्यास मदत होते. रायगड जिल्ह्यासाठी तब्बल ७ हजार ४२५ शाईच्या बाटल्या प्राप्त झाल्या आहेत. १९६२ साली पहिल्यांदाचा शाईचा उपयोग करण्यात आल्याने यावर्षी २०२४ साली तब्बल ६२ वर्ष पूर्ण झाली आहेत.

आयोगाने यावर्षी २६.५५ लाख शाईच्या बाटल्या खरेदी केल्या आहेत. यासाठी तब्बल ५५ कोटी रुपयांचा खर्च आला आहे. त्यामुळे शाईची किंमत वाढली असल्याचे स्पष्ट आहे. शाईमध्ये सिल्वर नायट्रेट हा प्रमुख घटक असतो. याच्या किंमतीनुसार शाईच्या किंमतीमध्ये चढ -उतार होत असतो. एकाच कंपनीकडून शाईची निर्मिती देशातील फक्त एक कंपनी या शाईची निर्मिती करते. म्हैसूर पेंट्स अँड वार्निश लिमिटेड (एमपीवीएल) या कंपनीच्या माध्यमातून शाईची निर्मिती केली जाते. कंपनीच्या माहितीनुसार, केंद्रीय निवडणूक आयोगाला २५ मार्चपर्यंत आवश्यक ती शाई पुरवण्यात आली आहे.

१९६२ मध्ये पहिल्यांदाच शाईचा वापर करण्यात आला होता. मिळालेल्या माहितीनुसार, त्यावेळी सुमारे ३ लाख ८९ हजार शाईंच्या बाटल्यांचा वापर करण्यात आला होता. यासाठी २.२७ लाख रुपये खर्च करण्यात आले होते. त्यामुळे भारतीय निवडणूक प्रक्रियेमध्ये शाईचा वापर सुरु होऊन २०२४ मध्ये ६२ वर्ष होत आहेत. भारतात पहिल्या सार्वत्रिक निवडणुका या १९५१-५२ मध्ये पार पडल्या होत्या. त्यावेळी मतदान झाल्यावर बोटाला शाई लावण्याचा नियम नव्हता. त्यावेळी काही मतदार हे दोनदा मतदान करण्यास येत होते. असे प्रकार थांबवण्यासाठी पान २ वर

### शाईचा फॉर्म्युला पूर्णपणे गुप्त

**शाई कशापद्धतीने बनवली जाते, त्यात कोणते संयुगे टाकले जातात याबाबत गुप्तता बाळगण्यात आली आहे. शाईचा फॉर्म्युला कंपनीने सार्वजनिक केलेला नाही. लोकांना याचा फॉर्म्युला कळाला तर ही शाई मिटवण्यासाठी लोक पर्याय शोधतील. आणि बोगस मतदान होण्याची भीती आहे. त्यामुळेच शाईचा फॉर्म्युला गुप्त ठेवण्यात आला आहे.**


✓सहकार क्षेत्रातील विश्वासार्ह नांव

रजि. नं. : आर.जी.डी./ए.बी.जी./आर.एस.आर./सी.आर./३०८/९२

**कमळ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अलिबाग**

(ISO 9001 : 2015 मानांकन प्राप्त तसेच CBS सेवाप्रणाली असणारी रायगड जिल्ह्यातील पतसंस्था)

मुख्य कार्यालय :- कमळ भवन, शिवाजी चौक, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०१. दूरध्वनी क्र. : ०२१४१-२२६७१६/२२७८६६

**सभासदांसाठी आग्रहाचे निमंत्रण**

**३२ वा वर्धापन दिन**

कमळ नागरी सहकारी पतसंस्थेच्या ३२ व्या वर्धापन दिनानिमित्त गुरुवार दि. ४ एप्रिल २०२४ रोजी संस्थेच्या अलिबाग येथील मुख्यालयात श्री सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आले आहे.
तरी यानिमित्त संस्थेच्या सर्व सभासदांना तिर्थ-प्रसादाचे आग्रहाचे निमंत्रण

तिर्थ-प्रसादाची वेळ : सायं. ५.०० ते ७.३०

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

३ एप्रिल

१) श्री. अरविंद वासुदेवराव कोहीरकर
अलिबाग, ३-४-१९४३

२) श्री. प्रसाद हरिश्चंद्र पाटील
पंतनगर, अलिबाग ३-४-१९५८



# अनुजा राणे यांना आचार्य पदवी

**पनवेल :** बँक ऑफ महाराष्ट्र पनवेलच्या माजी कर्मचारी राजश्री शिवराज राणे व पनवेल शहरातील सुप्रसिद्ध वकील शिवराज राणे यांच्या सुकन्या वकील अनुजा शिवराज राणे हिने कायद्यातील सर्वोच्च आचार्य पदवी प्राप्त केली.

अनुजाचा आचार्य प्रबंधाचा विषय ‘ Emerging perspective on constitutional morality in India : A critical study’ हा होता. सदर आचार्य पदवी ही अमिटी युनिव्हर्सिटी महाराष्ट्र या विद्यापीठातून वकील अनुजा राणे यांनी प्राप्त केली आहे. या पदवीसाठी अनुजा राणे यांना डॉ. दीपश्री एस. चौधरी असोसिएट प्रोफेसर यांनी मार्गदर्शन केले.

अनुजा राणे यांच्या यशाबद्दल बँक ऑफ महाराष्ट्रचे माजी कर्मचारी, गुणवंत कामगार व विशेष कार्यकारी अधिकारी, अरविंद मोरे व त्यांच्या सुविद्य पत्नी डॉ. प्रा. नीलिमा अरविंद मोरे दाम्पत्यांनी वकील अनुजा राणेचा स्वलिखित पुस्तक कुतुहलाचा करिश्मा व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अरविंद मोरे म्हणाले की, एवढ्या लहान वयात पीएच.डी पदवी प्राप्त करणे ही खरोखर कौतुकास्पद बाब आहे. तिच्या ह्या कर्तृत्वामुळे तरुणाईला नक्कीच प्रेरणा मिळेल. तिच्या या यशामुळे आई-वडील व राणे कुटुंबियांचे तिने नाव लौकिक केले आहे असे उद्‌गारून वकील अनुज राणेचे अभिनंदन करून तिला शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी दत्तकुमार सावंत, दिव्या सावंत, स्वाती सावंत आदी नातेवाईक उपस्थित होते.

# मावळमध्ये आचारसंहिता भंगाच्या तक्रारीत वाढ

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर लागू करण्यात आलेली आदर्श आचारसंहिता भंग करण्याच्या तक्रारीमध्ये मावळ लोकसभा मतदारसंघामध्ये वाढ झाली आहे. मावळ मतदारसंघात आतापर्यंत पैसे वाटप, भेटवस्तू आणि पक्षाचे फ्लेक्स बॅनर लावण्याच्या आरोपांशी संबंधित ३६ प्रकरणे नोंदवली गेली आहेत.

यामध्ये चिंचवड आणि पनवेल विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक तक्रारी दाखल करण्यात आल्या असून अनुक्रमे पिंपरीमध्ये ११ आणि पनवेल मध्ये १० तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत. जिल्हा प्रशासनाने या बाबतची दखल घेतली असून,तत्काळ कारवाईचे आश्वासन दिले आहे. तसेच तक्रारी प्राप्त झाल्यापासून १०० मिनिटांच्या आत तक्रारीचे निरसन करण्याचे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले आहे.

मावळ मतदारसंघातील विविध क्षेत्रांमधून आदर्श आचार संहितेचा भंग करणाऱ्या विरोधात तक्रार नोंदविण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून सी-व्हिजिल ॲप नावाचे ऑनलाईन पोर्टल उपलब्ध करून देण्यात आले आहे. या पोर्टलच्या माध्यमातून जिल्हा नियंत्रण कक्षाकडे तक्रारी नोंदविण्यात आल्या आहेत. शिवाय, इतर मतदारसंघात विभागणी आणि सीमांची माहिती स्पष्ट नसल्यामुळे,या पोर्टलद्वारे इतर भागातील तक्रारीही मावळकडे पाठवण्यात आल्या आहेत. अशा सर्व तक्रारींची प्रशासन तातडीने दखल घेत आहे. निवडणूक आयोगाने आचारसंहितेचे उल्लंघन झाल्यास थेट आयोग आणि जिल्हा प्रशासन प्रशासनाला तक्रार करण्यासाठी नागरिकांसाठी एक व्यासपीठ म्हणून सी व्हिजिल नावाने मोबाईल ॲप उपलब्ध करून दिले आहे.

या मोबाईल ॲप्लिकेशनमुळे नागरिकांना थेट निवडणूक अधिकाऱ्यांकडे तक्रारी नोंदवता येतात. शिवाय, तत्पर प्रतिसाद आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करून, तक्रारींचे निराकरण किंवा आवश्यक कार्यवाही सुरू करण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अधिसूचना अडीच तासांच्या आत जारी करणे अपेक्षित आहे.

सध्या सुरू असलेल्या निवडणुकीच्या काळात आचारसंहितेच्या विविध कथित उल्लंघनाच्या तक्रारी समोर आल्या आहेत. यामध्ये राजकीय पक्षांनी आयोजित केलेल्या धार्मिक कार्यक्रमांमध्ये साड्यांचे किंवा भेटवस्तूंचे वाटप, आर्थिक हँडआउट, पक्षाची चिन्हे आणि बॅनरचे प्रदर्शन आणि आचारसंहिता उल्लंघनाचा समावेश आहे. शिवाय, ग्रामीण भागातील सरपंच आणि उपसरपंच यांच्या सहभागाबाबतही चिंता व्यक्त करण्यात आली आहे. उपक्रम शिवाय, पक्ष कार्यालयातून आलेले फोन, तसेच सार्वजनिक ठिकाणी आणि सरकारी कार्यालयांमध्ये पक्षाचे बॅनर लावण्याच्या तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत.

प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, निवडणूक काळात आचारसंहिता भंगाची कोणतीही घटना सी-व्हिजिल ॲप किंवा नियंत्रण कक्षाद्वारे कळवावी. आतापर्यंत प्राप्त झालेल्या ३६ तक्रारींपैकी २४ तक्रारींचे निराकरण १०० मिनिटांच्या मुदतीत यशस्वीरित्या करण्यात आले आहे.

तथापि, १२ तक्रारी प्रलंबित राहिल्या आहेत, जे नियुक्त केलेल्या १०० मिनिटांपेक्षा जास्त प्रक्रियेची वेळ दर्शवतात. हे लक्षात घेण्यासारखे आहे की प्रशासनाच्या थेट सूचनेवर आधारित एकूण २८ तक्रारींची तातडीने दखल घेण्यात आली आहे.



■ माजी राज्यमंत्री मीनाक्षीताई पाटील यांना श्रद्धांजली अर्पण करताना ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील, अध्यक्ष विवेक पाटील, उपाध्यक्ष संजय कदम, माजी सरचिटणीस मंदार दोंदे, राजू गाडे, वैभव लबडे, सुनील राठोड आदी.

# स्व. मीनाक्षी पाटील यांना श्रद्धांजली

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाने पनवेल येथे माजी राज्य मंत्री, शेकाप नेत्या स्व. मीनाक्षीताई पाटील यांना श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी मंचाचे सल्लागार तथा ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील, अध्यक्ष विवेक पाटील, माजी सरचिटणीस मंदार दोंदे यांनी मनोगते व्यक्त करत मीनाक्षीताईंच्या स्मृतींना उजाळा दिला.

२९ मार्च २०२४ रोजी शेतकरी कामगार पक्षाच्या रणरागिणी, संघर्ष कन्या, अभ्यासू व्यक्तिमत्व असणाऱ्या मीनाक्षीताई पाटील यांनी अलिबाग तालुक्यातील पेझारी येथे वयाच्या ७६ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. माजी राज्यमंत्री मीनाक्षीताई पाटील यांनी १९९५, १९९९ आणि २००९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत प्रचंड मताधिक्याने विजय मिळवत तीन वेळा विधिमंडळाच्या सदस्या म्हणून वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी करत आपली छाप सोडली होती. तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या मंत्रिमंडळात मत्स्य व बंदर विकास विभागाचे राज्य मंत्रीपद भूषविताना त्यांनी उत्तम कामगिरी बजावली होती.

रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या त्या सलग बारा वर्षे अध्यक्ष होत्या. त्यांच्यासमवेत जिल्हा कार्यकारिणीवर खजिनदारपदी काम केलेल्या माधव पाटील यांनी रायगड जिल्हा पत्रकार संघाच्या उत्कर्षाकरता मीनाक्षीताईंनी केलेल्या भरीव योगदानाची उपस्थितांना जाणीव करून दिली. अध्यक्ष विवेक पाटील यांनी मीनाक्षी ताईंच्या समवेत व्यथित केलेल्या कालखंडातील स्मृतींना उजाळा दिला. तर मंदार दोंदे यांनी कर्नाळा वृत्त समूहात कार्यरत असताना मीनाक्षीताईंच्या सोबत काम करत असतानाच्या विविध आठवणी सांगत मीनाक्षीताइंच्या स्वभाव वैशिष्ट्यातील अनेक पैलू उलगडून दाखविले.

# अरुंद रस्त्यामुळे दोन वाहनांचा अपघात

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कल्याण कर्जत राज्य मार्ग रस्त्याला भेदून नेरळ माथेरान मिनीट्रेन जात असते. त्या ठिकाणी दुपदरी रस्ता अरुंद होतो. त्यामुळे तेथे सातत्याने अपघात होतात. मंगळवारी दुपारी नेरळमधून कर्जतकडे जाणाऱ्या एर्टिगा गाडीला ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात टेम्पो एर्टिगा गाडीला जाऊन धडकली. या अपघातात कोणालाही लागले नसल्याने या भागातील रास्ता रुंद करण्याची मागणी वाहनचालकांकडून सुरु आहे.

कल्याण कर्जत रस्त्यावर नेरळ पेट्रोल पंप येथे नेरळ येथून माथेरानकडे जाणारी मिनीट्रेन रस्त्याच्या मधून जात असते. हा रस्ता अस्तित्वात येण्याआधी ११५ वर्षांपूर्वी नेरळ माथेरान मिनीट्रेनचा मार्ग आहे.मागील



काही वर्षांपूर्वी कल्याण कर्जत राज्यमार्ग दुपदरी बनविला गेला. मात्र रेल्वे प्रशासनाची जमीन असल्याने त्या ठिकाणी हा रस्ता अरुंद बनला.त्यामुळे दोन्ही बाजूंनी वेगाने येणारी वाहने यांना त्या ठिकाणी अपघात होत होते. त्या भागात मागील दहा वर्षे १०० हुन अधिक अपघात झाले आहेत. त्यामुळे वाहनचालक यांच्या मागणीनुसार रेल्वे प्रशासनाने रस्त्याच्या दोन्ही बाजूला मिनीट्रेन मार्ग लक्षात घेऊन गतिरोधक बनविले आहेत. मात्र तरीदेखील आज २ एप्रिल रोजी नेरळ कडून कर्जत येथे जाणाऱ्या वाहनाला ओव्हरटेक करण्याच्या नादात टेम्पोने धडक दिली.

कर्जतकडे जाणारी एर्टिगा गाडी गतिरोधक ओलांडून रेल्वे मार्ग ओलनाडून जात असताना मागाहून कर्जत कडे जाणारा टेम्पो एम एच ०४,एच एस १००२ या गाडीने नव्याने बसविलेल्या गतिरोधक वरून वेगाने गाडी नेली आणि पुढे जाणाऱ्या एर्टिगा गाडीला जोरदार धडक दिली. त्या अपघातात वाहनांचे नुकसान झाले असून रस्त्याच्या अरुंद होण्याबद्दल नाराजी व्यक्त केली.

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी **मौजे तळाशेत, ता. अलिबाग, जि. रायगड** येथील खाली वर्णन केलेली शेती मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती संगिता अमोल आर्ते, कु. पलाष अमोल आर्ते यांचेकडुन खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरची मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विदयमान मालकांनी आमचे अशिलांना दिला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे तळाशेत, ता. अलिबाग, जि. रायगड**

| भूमापन क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मीटर | आकार रू. पै. |
|---|---|---|
| ९५/२ | २-१८-२० पैकी ०-७२-६६ | २.९१ |

विदयमान मालक यांचे मालकीच्या ०-७२-६६ हे. आर. या क्षेत्रापैकी ०-६३-६६ हे.आर.चौ.मीटर इतकी मिळकत

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा ) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला आमचे अशिलांना देण्यात येईल. तसेच मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील आणि त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दिनांक :-०२/०४/२०२४

**ॲड. दिपक विश्वनाथ नागे**
सदनिका क्र. १, तळ मजला,
लक्ष्मी को. ऑप. हौ. सोसायटी, कामत आळी,
मु.पो. ता. अलिबाग, जि.रायगड.

## पान १ वरून

### सहा वेळा शेकापची बाजी

त्यांना दुसऱ्या क्रमांकाची १,७३,२७० मते मिळाली होती, तर काँग्रेसचे अे.टी.पाटील यांना ६३,०३२ मतांवर समाधान मानावे लागले होते.१९९१ सालच्या निवडणुकीत काँग्रेसचे ए.आर.अंतुले हे २,१९,६३९ मते मिळवत ते विजयी झाले होते. शेकापचे दत्ता पाटील यांना १,७९,९३३ मते मिळाली होती, तर शिवसेनेचे सतिश प्रधान हे ९६,८८० मते मिळवत तिसऱ्या स्थानी राहिले होते. १९९६ साली पुन्हा काँग्रेसचे ए.आर. अंतुले (२,१३,१८७) विजयी झाले. त्यांनी शिवसेनेच्या अनंत तरे (२,०९,१८०) यांचा पराभव केला. शेकापचे दत्ता पाटील (१,८४,४६४) हे तिसऱ्या स्थानी राहिले होते. १९९८ साली मात्र शेकापने पराभवाचा बदला घेतला. शेकापचे रामशेठ ठाकूर यांना २,४८,३५३ मते मिळाली आणि ते विजयी झाले. काँग्रेसच्या अंतुले यांना २,३९,२२७, तर शिवसेनेच्या अनंत तरे यांना २,०८,४५९ मते मिळाली. त्यानंतर १९९९ साली वाजपेयी सरकार अल्पमतात आल्याने गडगडले होते. १९९९ साली पुन्हा निवडणुका लागल्या त्यामध्ये पुन्हा शेकापचे रामशेठ ठाकूर (२,७४,३६१) यांनी बाजी मारली होती. शिवसेनेचे डी.बी. पाटील (२,३१,२६४), तर काँग्रेसच्या पुष्पा साबळे यांना १,४८,१४६ मते मिळाली होती.२००४ साली झालेल्या निवडणुकीत काँग्रेसच्या अंतुले यांनी कमबॅक केले. त्यांनी ३,१२,२२५ मते मिळवत विजयी झाले होते. शेकापचे विवेक पाटील यांना २,८०,३५५ मते मिळाली, तर शिवसेनेचे शाम सावंत यांना १,६४,२४२ मते मिळाली होती. २००९ साली शिवसेनेच्या अनंत गीते (४,१३,५४२ ) यांनी काँग्रेसच्या अंतुले (२,६७,०२५ ) यांचा पराभव केला. २०१४ साली पुन्हा शिवसेनेचे अनंत गीते विजयी झाले. गीतेंना ३,९६,१७८ मते मिळाली होती. राष्ट्रवादी काँग्रेसचे सुनील तटकरे यांना ३,९४,०६८ मते मिळाली. त्यामध्ये तटकरेंचा पराभव झाला. शेकापचे रमेश कदम यांना १,२९,७३० मते मिळाली होती. २०१९ साली राष्ट्रवादी काँग्रेसचे सुनील तटकरे यांना ४,८६,९६८ मते मिळाली. त्यामध्ये ते विजयी झाले, तर अनंत गीते यांना ४,५५,५३० मते मिळाली होती.

### बोटावर लागणारी शाई झाली ६२ वर्षांची

बोटाला शाई लावण्याचा पर्याय समोर आला.

केंद्रीय निवडणूक आयोगाने या पार्श्वभूमीवर पर्यायाची चाचपणी सुरु केली होती. नॅशनल फिजिरल लॅबोरेटरी ऑफ इंडिया (एनपीएल) सोबत आयोगाने बोलणी केली. पाणी किंवा इतर रसायनाने मिटल्या न जाणाऱ्या शाईची आयोगाला गरज होती. म्हैसुर पेंट्सने ही जबाबदारी घेतली. १९६२ पासून हीच कंपनी देशाला मतदानासाठी लागणारी शाई पुरवते. विशेष म्हणजे कंपनी इतर ३० देशांना देखील शाईचा पुरवठा करते.

### कमी पटसंख्येच्या शाळांचा होणार ‘क्लस्टर’

पाल्याला शिक्षण देण्यासाठी पालकांचा कल अधिक पाहावयास मिळाला आहे. यामुळे रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये पटसंख्या कमी होऊन शाळा बंद झाल्या आहेत. पटसंख्या कमी होऊन शाळा बंद होऊ नये, यासाठी शाळांचा क्लस्टर करण्याचा पर्याय रायगड जिल्हा परिषदेने अवलंबला आहे. रायगड जिल्ह्यातील दुर्गम असणाऱ्या सात तालुक्यांमधील तब्बल ८२ शाळांचा क्लस्टर करण्याचा प्रस्ताव शिक्षण विभागाने शिक्षण आयुक्तांकडे सादर केला आहे. यामध्ये कर्जत ५, खालापूर १०, म्हसळा ८, पोलादपूर ११, सुधागड १०, श्रीवर्धन ५ आणि पेण तालुक्यातील ३३ शाळांचा समावेश आहे. या शाळा ३३ शाळांमध्ये समायोजित करण्यात येणार आहेत. यामुळे तब्बल १ हजार १५९ विद्यार्थ्यांच्या प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न मार्गी लागणार आहे. ८२ शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी कर्जत २, खालापूर १, म्हसळा १, पोलादपूर १, सुधागड ३, श्रीवर्धन ३ आणि पेण तालुक्यातील २२ शाळांमध्ये शिक्षणाचा मार्ग खुला केला जाणार आहे. या शाळांमध्ये २ हजार ११८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आता या विद्यार्थ्यांमध्ये १ हजार १५९ विद्यार्थ्यांची भर पडणार आहे. शिक्षण आयुक्तांकडे सादर केलेल्या प्रस्तावाला हिरवा कंदील मिळाल्यास रायगड जिल्ह्यात समूह शाळांचा प्रयोग यशस्वी ठरणार आहे.

**अशी असणार क्लस्टर शाळा**

अनेक शाळांमधील विद्यार्थ्यांना एकत्र आणणारी एकशाळा म्हणजे ‘क्लस्टर शाळा’. कमी पटसंख्येच्या शाळा असलेल्या भागातील काही अंतरावरील एक मध्यवर्ती शाळा निवडून त्या शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा दिल्या जाणार आहेत. त्या विद्यार्थ्यांना त्यांच्या गावापासून याशाळेत यावे लागते. क्लस्टर शाळेपर्यंत पोचविण्यात विद्यार्थ्यांना अडचणी येऊ नयेत, म्हणून त्यांचा प्रवास खर्च सरकारतर्फे करण्याच्या पर्यायाचा विचार केला जात आहे. कंपनी अथवा स्वयंसेवी संस्थांच्या सहभागाचा विचार केला जाणार आहे.

### वरंध घाट बंद

सदरची कामे पावसाळ्यापूर्वी या स्थितीमध्ये होणे शक्य नसल्याने १ एप्रिल ते ३० मेपर्यंत वरंधगाव ते रायगड जिल्हा हद्दीमधील वाहतूक पूर्णपणे बंद करावी, अशी मागणी राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून करण्यात आली होती. त्याआधारे अप्पर जिल्हा दंडाधिकारी संदेश शिर्के यांनी हा आदेश निर्गमित केला आहे.

### फक्त १३ टँकर

विहीरी, पाणी साठवण टाकी बांधण्यात आली. मात्र आजही काही गावे पाण्यापासून वंचित असल्याचे समोर आले आहे. पाण्याची पातळी कमी झाल्याने धरणांमधून माती मिश्रीत पाणी पुरवठा होत आहे. अनेक गावांमध्ये दोन ते तीन दिवसआड पाणी पुरवठा होत आहे. त्यामुळे ऐन उन्हाळ्यात नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे.

जिल्ह्यातील अलिबाग, पेण व पनवेल या तीन तालुक्यात पाण्याची समस्या निर्माण झाली आहे. ही समस्या सोडविण्यासाठी प्रशासनामार्फत अलिबागमधील २ गावांमधील ५ हजार ४३९ नागरिकांसाठी १ टँकर, पेणमधील २ गावे, ३६ वाड्यांतील ३ हजार ९४२ नागरिकांसाठी ६ टँकर, पनवेलमधील ६ गावे, ७ वाड्यांतील १२ हजार ८८४ नागरिकांसाठी ६ टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यास सुरुवात केली आहे.

### महिलेचा खून करणारा अटकेत

महिलेच्या संपर्कात असणाऱ्या व्यक्ती व परिसरात राहत असणाऱ्या व्यक्ती यांच्याकडील माहितीच्या आधारे व गुप्त बातमीदारांनी दिलेल्या माहितीनूसार, महिलेसोबत राहणारा अनोळखी इसमाबाबत पोलिसांना माहिती मिळाली. त्यावरून महिलेचा गळा दाबून पसार झालेल्या इसमानेच तिचा खून केल्याचे प्रथम दर्शनी निष्पन्न झाले. पांडव गोरख जाधव हा २९ मार्च २०२४ रोजी ओरियन मॉल पनवेल येथे असल्याबाबतची माहिती पोलीस हवालदार महेश पाटील यांना मिळाल्याने मध्यवर्ती कक्षाच्या पथकाने पांडव गोरख जाधव उर्फ पांड्या (वय २१वर्षे) याला शिताफिने ताब्यात घेतले. त्याच्याकडे सतत ७ ते ८ तास कसून चौकशी केली. तो गुन्हा घडल्यापासून स्वतःचे अस्तित्व बदलून महाराष्ट्रात इतर जिल्ह्यांमध्ये व गुजरात राज्यातील सुरत येथे राहत असल्याचे सांगून पांडवने गुन्हा केल्याची कबुली दिली. पांडव गोरख जाधव व मयत महिला यांचे प्रेमसंबध असून घटनेच्या दिवशी पांडव व मयत महिला यांच्यात दारू प्यायल्याने झालेल्या भांडणातून पांडव याने महिलेचा गळा दाबुन खुन केला असल्याचे तपासात निष्पन्न झाले.

### संजय सिंह यांना जामीन मंजूर

बजावली होती. ज्यामुळे काही मद्य उत्पादक, घाऊक व्यापारी आणि किरकोळ विक्रेत्यांना नफा झाला, असा आरोप त्यांच्यावर करण्यात आला होता. सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीदरम्यान ईडीने पीएमएलए कायद्याच्या कलम ३ आणि ४ अंतर्गत चौकशी सुरू असताना संजय सिंह यांना जामीन देण्यास हरकत नसावी, असे सांगितले. जामीनाच्या अटी काय असाव्यात? हे सत्र न्यायालयात ठरविण्यात येणार आहे. आज सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश संजीव खन्ना यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने ज्यामध्ये न्या. दिपांकर दत्ता आणि पीबी वराळे यांचाही समावेश होता. जामीन मिळाल्यानंतर संजय सिंह राजकीय कार्यक्रमात सहभागी होऊ शकतात, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे. अतिरिक्त महाधिवक्ता एसव्ही राजू यांनी ईडीची बाजू मांडली. ते न्यायालयाला म्हणाले की, हे प्रकरण वादग्रस्त असले तरी त्यांना सवलत देता येऊ शकते. संजय सिंह यांना ४ ऑक्टोबर रोजी अटक करण्यात आली होती.

### खांदेरीवरून परतणारी बोट पलटी

दर्शनासाठी गेले होते. देवाचे दर्शन घेऊन झाल्यावर ते परतीच्या मार्गावर निघाले. किल्ल्यापासून काही अंतरावर गेल्यावर खवळलेल्या समुद्रातील पाण्यामध्ये बोट पलटी झाले. बोटीतील सुमारे १५ तरुण पाण्यात पडले. मात्र त्यांनी पोहत किनारा गाठल्याने मोठी जीवितहानी टळली असल्याची माहिती समोर येत आहे.

**जाहिर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या निवासी सदनिकेचे विद्यमान मालक श्री. संजय दत्ताराम पाटील, रा. ममता नगर, कलश, बी-विंग, रुम नं.८, दुसरा मजला, चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकीहक्काचा व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली निवासी सदनिका माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर माझे अशिलांनी केली आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा हवाला विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे चेंढरे, ता. अलिबाग येथील सर्व्हे नं. ४/१/ब, प्लॉट नं. १+२ या मिळकतीवर बांधण्यात आलेली कलश को. ऑप. हौसिंग सोसायटी लि., या इमारतीमधील बी-विंगमधील दुसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र. ८ (ग्राम पंचायत चेंढरे मालमत्ता क्र. ११५४/८), क्षेत्र ३७५ चौ. फूट कारपेट ही निवासी सदनिका.

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा कब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०२/०४/२०२४ सही /-

**ॲड. विवेक रमेश साळवी**
शॉप नं. ५, दुय्यम निबंधक कार्यालयासमोर
ता. अलिबाग, जि.रायगड

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-आवास. अलिबाग, येथील गट नंबर २१२, एकूण क्षेत्र ०-०८-१० हे.आर., आकार १.५६ रू.पै. या मिळकतीपैकी मनोहर अनंत पाटील यांच्या मालकीचे निम्मे क्षेत्र ही मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक मनोहर अनंत पाटील रा. मु. पो. आवास, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचं वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ०२/०४/२०२४

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राह्मण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

**जाहीर नोटीस**

अर्जदारांचे वकील
ॲड. आशिष विकास देशपांडे

मुरुड येथील दिवाणी न्यायाधिश क. स्तर साो. यांचे न्यायालयांत
दि. चौकशी अर्ज क्र. ५/२०२४

सज्जाद अब्दुल रेहमान खान, वगैरे........ अर्जदार
विरुध्द
कोणीही नाही. ..... सामनेवाला

याव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, पै. रजिया उस्मान शेख ह्या ता. १०/१२/२०२३ रोजी मयत झाल्या आहेत. त्यांचे पश्चात सज्जाद अब्दुल रेहमान खान, तंजीम अ. रेहमान खान आणि मुसरत जहाँ अहमद लोगडे हेच कायदेशीर वारस आहेत हे ठरवुन मिळण्याकरीता मुरुड येथील मे. न्यायालयामध्ये अर्जदार यांचे नावे कायदेशीर वारस असल्याचा वारस दाखला/ हेअरशिप सर्टिफिकेट करीता सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

तरी असा दाखला देणेंस कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी तारीख २५/०४/२०२४ रोजी किंवा तत्पुर्वी कार्यालयीन वेळेत मे. कोर्टात हजर राहून आपली हरकत लेखी स्वरूपात दयावी. मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास या कामी योग्य तो हुकूम करण्यांत येईल व मागाहून कोणाचीही हरकत, तक्रार आल्यास तिची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक १२ माहे ०३ सन २०२४ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्यानिशी दिली.

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय मुरुड**

शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायायल मुरुड,**

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील क्षेत्राचे वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक **१) श्री. रामचंद्र शंकर सुखटणकर** यांचे मालकी हक्क तपासणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे-मापगांव, ता.अलिबाग, जि. रायगड**

| क्र. | भूमापन क्र व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|
| १ | १६ | जिरायत ०.७०.५० पो.ख. ०.०१.०० एकुण ०.७१.५० | १८.५६ |

**वरील मिळकती पैकी श्री. रामचंद्र शंकर सुखटणकर यांचे नावे असणारे, क्षेत्र ००.५०.५० हे आर, पो.ख. ००.०१.०० हे. आर.आकार १३.२९/- रु. पै या नोटीसीचा विषय आहे.**

वर वर्णन केल्या प्रमाणे क्षेत्राची जमिन मिळकती ह्या त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहिवाटीतील असून, त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्या बाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीं वर अथवा तिचे कोणत्याही भागावार कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचाकरार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरीहक्क या अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत आल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखीस्वरूपात आणून द्यावीत, मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकती विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काच्या आहेत व त्यावर अन्य कुणाचा ही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १८/०२/२०२४

**ॲड. राहुल रमेश नाईक**
मु. नागांव, ता. अलिबाग
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

# लबाडीची हद्द

आमच्या देशाचा पंतप्रधान लबाड आहे असे म्हणायला कोणत्याच नागरिकाला आवडणारे नसते. दुर्दैवाने नरेंद्र मोदींसंदर्भात आपणा सर्वांवर ही वेळ वारंवार येते. कोरोनाच्या काळात आधी लस लोकांना विकतच घ्यावी लागेल असे सरकारने सांगितले. त्याला विरोध झाला. शेवटी प्रकरण न्यायालयात गेले. मग सरकारने एकदम बाजू बदलली. जनतेला फुकट लस देण्याचे आदेश आले. नंतर ती जणू स्वतःचीच योजना असल्याप्रमाणे त्याचे श्रेय पंतप्रधानमहोदय घेऊ लागले. आजही ते परदेशात जाऊन याबद्दल शेखी मिरवत असतात. पण ती सौम्य म्हणावी अशा वाईट प्रकारची लबाडी पंतप्रधान मोदी आता करू पाहत आहेत. ती निवडणूक रोख्यांच्या संदर्भात आहे. या रोख्यांचा कायदा केला म्हणून आज कोणत्या पक्षाला कोणाकडून देणगी मिळाली हे कळते आहे, असा दावा मोदी यांनी सोमवारी केला. ही खोटारडेपणाची हद्द आहे. पंतप्रधानपदावर बसलेल्या व्यक्तीने इतके खोटे बोलावे आणि जनतेला इतके मूर्ख समजावे असे गेल्या ७५ वर्षांमध्ये कधी झाले नव्हते. रोख्यांचा जो कायदा मोदी सरकारने आणला त्यात देणग्या देणाऱ्यांची नावे गुप्त ठेवली जातील हेच मुख्य कलम होते. ही गुप्तता राखण्यासाठी सरकारने जंग जंग पछाडले. कम्युनिस्ट पक्ष व इतर कार्यकर्त्यांनी त्याविरुध्द कोर्टात धाव घेतली. ही याचिका हाणून पाडण्यासाठी सरकारने वाटेल ते युक्तिवाद केले. कोणत्या पक्षाला कोणत्या कंपनीने वा व्यक्तीने किती पैसे दिले ही माहिती मागण्याची सामान्य माणसाला अधिकारच नाही हा सरकारचा पहिला बचाव होता. पैसे देणाऱ्यांची नावे गुप्त राहतील असे या कायद्यातले आश्वासन आहे असा दावाही सरकारी वकिलांनी केला. म्हणजेच जनतेपासून माहिती दडवण्यासाठीच मोदी सरकारने हा कायदा केलेला होता. त्यामुळे माझ्या कायद्यामुळे लोकांना माहिती मिळते आहे असे म्हणणे म्हणजे मी दिवसाढवळ्या खून केला म्हणून तुम्हाला साक्षीपुरावे मिळाले असे एखाद्या निर्ढावलेल्या खुन्याने म्हणण्यासारखे आहे.

## काळ्या पैशाला मोकळी वाट

२०१४ च्या पूर्वीही निवडणुकांना पैसे लागतच होते. ते कसे जमा होत होते हे कोणालाही कळत नव्हते. ते आता कळू शकेल असेही मोदी यांनी म्हटले आहे. हे विधान असेच लबाडीचे आहे. पूर्वी राजकारणात बराच काळा पैसा येत होता ही बाब खरी आहे. पण याचा अर्थ आता तो येण्याचे थांबले आहे असे नव्हे. उलट या कायद्यामुळे असा काळा पैसा बँकेमार्फत प्रचारात आणण्याची सोय भाजपने करून दिली. निवडणूक रोखे घेणाऱ्याचे नाव गुप्त ठेवले जाणार होते. शिवाय कंपनी कायद्यात बरेच बदल करण्यात आले होते. पूर्वी फक्त फायद्यात असलेल्या कंपन्या आपल्या निव्वळ नफ्याच्या ठराविक प्रमाणातच राजकीय देणग्या देऊ शकत होत्या. आता कंपनी तोट्यात असली तरीही तिला देणगी द्यायला परवानगी होती. एअरटेल कंपनीचे ढळढळीत उदाहरण आहे. ही कंपनी मोठ्या तोट्यात आहे. पण तिने शेकडो कोटींच्या देणग्या भाजपला दिल्या. त्या बदल्यात तिला नवीन परवाने मिळाले असा आरोप होतो. रिलायन्सशी संबंधित असलेल्या मुंबईच्या क्विकसप्लाय नावाच्या कंपनीचा फायदा ८० कोटी आणि तिने निवडणूक रोख्यांमार्फत देणग्या दिल्या ४१० कोटींच्या. असे कित्येक प्रकार यात घडले आहेत. लॉटरी धंदेवाल्या मार्टिनकडे हजारो कोटी रुपयांच्या देणग्या द्यायला कुठून पैसे आले हाही प्रश्नच आहे. त्यामुळे या योजनेतला काळा पैसा बंद न होता उलट त्याला बँकेमार्फत पवित्र करून घेण्याचे काम मोदी सरकारने केले. आपण करीत असलेला हा भ्रष्टाचार उघड होऊ नये म्हणूनच यातली माहिती गुप्त ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न सरकारने केला. स्टेट बँकेने ही माहिती देण्यास सहा महिने लागतील असे सांगितले. सर्वोच्च न्यायालयाचा दट्ट्या येताच दोनच दिवसात तीच माहिती जनतेपुढे आली. त्यातही एक गुप्त क्रमांक लपवण्याचा प्रयत्न झाला. पण न्यायालयाने तोही जाहीर करायला लावला.

## भ्रष्टाचाराचा मार्ग दाखवला कोणी?

ही दडपादडपी करण्यासाठी हरीश साळवे यांच्यासारख्या महागड्या वकिलांना उभे करण्यात आले. ते बालिश कारणे सांगत राहिले. याचे थेट प्रसारण जनतेने पाहिले. हे सर्व जनतेला माहिती देण्यासाठी होते असे मोदींना म्हणायचे आहे काय? स्टेट बँकेने सर्व माहिती उघड केल्यानंतर भाजपला एकूण आठ हजार २५० कोटी रुपये मिळाले हे स्पष्ट झाले. त्यातले सुमारे दोन हजार कोटी रुपये हे २०१९ पूर्वीचे आहेत. हे पैसे कोणी दिले याचे तपशील आपल्याकडे नाहीत असा पवित्रा भाजपने घेतला आहे. आता मोदींच्याच म्हणण्यानुसार जायचे तर भाजपने ही माहिती मोठमोठ्या जाहिराती देऊन सर्वत्र प्रसारित केली पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाचा पहिला निर्णय १५ फेब्रुवारीला आला. त्यावेळी, ज्या कायद्याचे श्रेय पंतप्रधान घेऊ पाहत आहेत तोच मुळात न्यायालयाने घटनाबाह्य ठरवला होता. त्यातील दडपादडपी अवैध ठरवली होती. त्या निर्णयाद्वारेच स्टेट बँकेला देणग्यांचा तपशील जाहीर करा असा पहिला आदेश देण्यात आला व त्यावर २५ दिवस जाऊनही स्टेट बँकेने काही केले नाही. या सर्व काळात पंतप्रधानांना यावर काहीही बोलावेसे वाटले नाही. मधल्या काळात अनेक हिकमती पत्रकारांनी या रोख्यांमुळे झालेला भ्रष्टाचार उघडकीस आणला. मेघा इंजिनिअरिंगसारख्या कंपन्यांना मिळालेली कंत्राटे व त्यांनी भाजपसह अनेक पक्षांना दिलेल्या देणग्या यांचा संबंध या पत्रकारांनी जोडून दाखवला. भाजपला हजारो कोटींची देणगी दिलेल्या यातल्या अनेक औषधी कंपन्या या विविध भानगडींमध्ये अडकलेल्या आहेत. टोरंट फार्माला महाराष्ट्रात २८५ कोटींची करमाफी मिळाल्यावर तीच कंपनी भाजपला १८५ कोटींची देणगी देते हे प्रकरण साधेसुधे नाही. आता मोदींनी आपले तोंड उघडलेच आहे तर त्यांनी या भ्रष्टाचाराच्या आरोपांचाही खुलासा करायला हवा. भ्रष्टाचार सर्वच पक्षांनी केला आहे असे मोदींचे म्हणणे असेल तर हा राजमार्ग मीच सर्वांना दाखवून दिला आहे असे म्हणून त्याची जबाबदारीही त्यांनीच घ्यायला हवी.

विचार

# अनैसर्गिक जवळीक कशासाठी?

**राजकारण प्रवाही असते. इथे कोणी कायमस्वरुपी शत्रू वा मित्र नसतो. अलिकडच्या भाजपा आणि मनसेच्या जवळकीद्वारे ही बाब पुन्हा एकदा अधोरेखित होत आहे. मागील निवडणुकीत मोदींवर तोंडसुख घेणारे राज ठाकरे आता मात्र बराच वेळ वाट पाहून झालेल्या भेटीतून काय पदरात पडते, हे बघताना दिसले. दुसरीकडे भाजपाही त्यांच्या शैलीदार भाषणांचा लाभ करुन घेईल आणि एक अनैसर्गिक जवळीक साधली जाईल.**



निवडणुकांचे पडघम वाजू लागल्यापासून राज्य आणि देशपातळीवर अनेक प्रकारची मेतकुटे बघायला मिळत आहेत. भाजपाचा 'अबकी बार ४०० पार' चा नारा असला तरी प्रत्यक्षात विविध पक्षांना आमंत्रणे देण्याचे त्यांचे धोरण आणि वास्तव वेगळे आहे. याचाच एक भाग म्हणून भाजपा आणि मनसेमधील ताज्या संबंधांकडे बघावे लागेल. भाजपाने राज ठाकरे यांना जवळ करण्यामागे केवळ लोकसभा निवडणुकांचे कारण नाही तर त्यांना आता विधानसभा डोळ्यासमोर ठेवूनही काही निर्णय घ्यावे लागणार आहेत. त्याचबरोबर मुंबई, नाशिक आणि पुणे महानगर पालिकेच्या निवडणुकाही त्यांच्यापुढे आहेत. खेरीक्षर सध्याची निवडणूकनीती बघता भाजपाने देशभर आघाड्या केल्याचे दिसत आहे. अगदी केजरीवाल यांना तुरुंगात टाकल्याची घटनादेखील या अर्थाने पुरेशी बोलकी आहे. कोणत्याही परिस्थितीत मताधिक्य कमी होऊ न देण्यासाठी त्यांनी आपले उमेदवारही बदलले आहेत. म्हणजेच प्रत्येक ठिकाणच्या जागा वाढवण्यासाठी करता येईल ते सगळे ते करत आहेत, कारण त्यांना प्रस्थापितांविरोधातील लहर स्पष्ट दिसत आहे. त्यामुळेच ३७० पेक्षा अधिक जागा मिळणार असल्याचे ते सांगत असले तरी हा लोकांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न आहे. बदलत्या लहरीत सरकार जाण्याची शक्यता नसली तरी ताकद होण्याची भीती आहेस. त्यामुळेच त्यांचा जवळ येऊ शकणाऱ्या प्रत्येक पक्षाला बरोबर घेऊन निवडणूक लढवण्याचा विचार आहे.

राज ठाकरेंना बरोबर घेण्यामागे उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे नुकसान घडवणे हा एक मुख्य विचार आहे. याचे कारण म्हणजे एकनाथ शिंदेंकडे ठाकरे हे आडनाव नाही. खेरीज त्यांच्याकडे करिश्माही नाही. मनसेकडे करिश्मा असणारा नेता असला तरी संघटना काहीच नाही. हा पक्ष केवळ सोशल मीडियावर कार्यरत असतो आणि टीव्ही वाहिन्यांना मॅनेज करुन आपल्या बातम्या प्रसारित करुन मोठा पक्ष असल्याचे भासवतो. प्रत्यक्षात मनसे पूर्णपणे पोकळ आहे. पण असे असले तरी राज ठाकरेंना बरोबर घेतल्यास उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेची मते कमी करण्यास मोठी मदत

**जनार्दन पाटील**

मिळू शकते. काही ठिकाणी ते मनसेचा उमेदवारही उभा करतील. एकदा अधिकृत युती झाली की, काही ठिकाणी मनसेचा उमेदवार नसला तरी राज ठाकरे प्रचाराला येऊ शकतात. स्वाभाविकच ते उद्धव ठाकरेंना लक्ष्य करतील. यातून मुंबईतील साधारणतः ३० ते ३२ टक्के मराठी मते मिळवण्याचा त्यांचा मार्ग सुकर होऊ शकतो, कारण दुसरीकडे परप्रांतीयांची मते भाजपाला असतातच. त्यामुळेच या समिकरणातून भाजपा मुंबई, पुणे आणि नाशिकमध्ये फायदा करुन घेऊ शकतो. बाकीच्या ठिकाणी मनसेचा प्रभाव शून्य आहे. खरे तर मनसेला मध्य मुंबईतील जागा हवी आहे, पण ती काही मिळणार नाही. केवळ दक्षिण मुंबईची जागा त्यांना मिळू शकते. तिथे राहुल नार्वेकर असले तरी लोकप्रिय नाहीत. त्यातही अलिकडच्या निवाड्यांमुळेही त्यांच्या प्रतिमेला मोठा फटका बसला आहे. त्यामुळेच ते येथून पडण्याची शक्यता अधिक आहे. असे असताना युती झाल्यास तिथून बाळा नांदगावकर वा अमित ठाकरे यांच्यापैकी एकाला उभे करता येईल, अशी शक्यता आहे. खेरीज राज ठाकरे यांच्या शैलीदार भाषणांचाही मोठा उपयोग होऊ शकतो.

अजित पवार आणि एकनाथ शिंदे हे दोन्ही 'हेवी वेट' नेते असले, तरी त्यांच्यामुळे फार फायदा होत नाही, असे लक्षात आल्यानेच भाजपला राज ठाकरे यांची गरज वाटत असल्याचे उघड आहे. युती करण्यात दोघांचीही मजबुरी आहे. खरे पाहता मनसे आणि भाजप यांच्या विचारसरणीमध्ये कमालीचा फरक असताना आणि खळ्ळ खट्याकची भाषा भाजपला मंजूर नसतानाही हे दोन पक्ष एकत्र येत असून महायुतीमध्ये आणखी एका पक्षाची भर पडत आहे. आतापर्यंत ज्यांचे राजकारण मराठी माणूस आणि त्याचे हितसंबंध तसेच खळ्ळ खट्याकसाठी होते, त्यांनाच आता आपल्या राजकारणासाठी मनसेच्या इंजिनची दिशा बदलावी लागते आहे. लवकरच महायुतीचे जागावाटप आणि उमेदवारीची घोषणा होण्याची शक्यता आहे. राज यांनी लोकसभेच्या दोन जागांची मागणी केली असली तरी प्रत्यक्षात त्यांची एकाच जागेवर बोळवण होण्याची शक्यता आहे. मनसेची स्थापना झाल्यानंतर पहिल्याच निवडणुकीत १३ आमदार निवडून आणणाऱ्या आणि लोकसभेतही काही जागांवर दुसऱ्या क्रमांकाची मते मिळवणाऱ्या राज यांच्या पाठीमागे युवा वर्ग मोठ्या प्रमाणात होता. त्यांनी राजकारणात नव्या संकल्पना आणण्याचा प्रयत्न केला. उमेदवाराची निवड परीक्षा घेऊन करण्याची त्यांची संकल्पना खरेच चांगली होती; परंतु नंतर त्यांनी या संकल्पना बासनात गुंडाळल्या. त्यातच राजकारण्याने २४ तास सतर्क राहिले पाहिजे, महाराष्ट्रात सतत पायाला भिंगरी लावून फिरले पाहिजे, ही तत्वे राज यांनी कधीच अनुसरली नाहीत. वर्षा-सहा महिन्यातून एकदा शिवतीर्थावरून बाहेर पडून राजकारण होत नसते. त्यात त्यांचा धरसोडपणा आणि निवडणुकीकडे गांभीर्याने पाहण्याच्या अभावामुळे महाराष्ट्रातील जनतेचा, त्यातही युवकांचा भ्रमनिरास झाला.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत राज यांच्या मनसेने १०१ जागांवर उमेदवार उभे केले होते. त्यातील ८६ उमेदवारांना अनामत रक्कमही वाचवता आली नाही. त्यांच्या सर्व उमेदवारांची एकूण मते १२ लाख ४२ हजार १३५ एवढी होती. एकूण मतांशी तुलना करता हे प्रमाण अवघे २.२५ टक्के आहे. असे असताना महाराष्ट्रात प्रतिष्ठेच्या बनलेल्या लोकसभा निवडणुकीत एवढ्या कमी मताच्या पक्षाला भाजप एवढे महत्व का देत आहे, याचे उत्तर त्याच्या महत्त्वाकांक्षी 'चारसो पार'मध्ये दडले आहे, हेच पुन्हा एकदा सांगावे लागेल. महाराष्ट्र नवनिर्माण सेना आता तारुण्यात आली आहे. पक्षस्थापनेला १८ वर्षे झाली असताना त्यांच्या आमदारांची संख्या वाढण्याऐवजी कमी होत आहे. नाशिक महानगरपालिकेत सत्तेपर्यंत पोहोचलेल्या आणि पुण्यात २९ नगरसेवक निवडून आणणाऱ्या मनसेला नंतर मात्र दोन आकडी संख्या गाठता आली नाही. गेल्या विधानसभा निवडणुकीत तर फक्त कल्याणची जागा निवडून आणता आली. अपेक्षित यश न मिळाल्याने मनसेचे कार्यकर्ते संभ्रमित आहेत. त्यामुळे राज यांनाही पक्ष वाचवण्यासाठी कोणाशी तरी युती करणे भाग होते. त्यासाठी त्यांच्यावर मोठा दबाव होता. अर्थात शाह यांच्याशी चर्चा करून भाजपशी युती केल्याने राज यांना प्रत्यक्षात किती आणि कसा फायदा होणार हे समजून घेतले पाहिजे. राजकारणात एक अधिक एक बरोबर दोन होत नसते. कधी ते तीन होत असते तर कधी एकही होत असते. शिवसेना फोडल्याने मुंबईकरांमध्ये भाजपविरोधात प्रचंड नाराजी आहे. त्यामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी भाजपने राज यांना बरोबर घेण्याचे ठरवले आहे.

आता राज यांना पुन्हा भूमिका बदलून भाजपासोबत जायचे आहे. शहा यांच्या भेटीचे वर्णन त्यांच्या पक्षाने 'सकारात्मक' असे केले आहे; पण गेल्या निवडणुकीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना फेकू, हिटलर, लबाड अशी शेलकी विशेषणे बहाल करणाऱ्या राज यांच्यावर आता मोदी यांच्यासाठी फलंदाजी करण्याची वेळ आली आहे. त्यांना सोबत घेऊन भाजप काय साध्य करू शकेल, हा प्रश्न आहे. गेल्या वर्षी पुण्यातील पिंपरी येथे डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठामध्ये आयोजित जागतिक मराठी अकादमीच्या संमेलनात पंतप्रधानांनी सर्व राज्यांना आपल्या मुलाप्रमाणे वागवावे आणि सर्वांना समान मागणी द्यावी, केवळ गुजरातमधून आले म्हणून त्यांनी गुजरातबद्दल बोलू नये; हे त्यांच्या उंचीला शोभत नाही अशी टीका राज यांनी केली होती. त्यानंतर वेदांत समूह आणि तैवानची फॉक्सकॉन यांनी गुजरातमध्ये नवीन सेमीकंडक्टर प्रकल्प उभारण्यासाठी सामंजस्य करार केला. अगोदर हा प्रकल्प महाराष्ट्रात होणार होता. त्यासाठी एक लाख ५४ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार होती. या प्रकल्पासोबतच अन्य अनेक प्रकल्प तसेच कार्यालये गुजरातमध्ये गेल्यामुळे त्यावरही राज यांनी टीका केली होती. मोदी यांची तुलना हिटलरशी करणाऱ्या राज यांना आता भाजपचे भलतेच प्रेम उसळून आले आहे. राजकारण प्रवाही असते. काही वेळापूर्वी एकमेकांचे गळा धरणारे अचानक गळ्यात गळा घालू लागतात. तसे भाजप आणि राज यांचे झाले आहे. भाजपलाही मोदींचे कडवे टीकाकार असणाऱ्या राज यांच्यात झालेला बदल कसा सहन होतो, असा प्रश्न उपस्थित होत आहे. राज आता मोदी यांचे कौतुक कसे करणार याची दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांना उत्सुकता लागली आहे. शिवाय त्यांची एकी महाराष्ट्रातील मतदार स्वीकारणार का, हा ही प्रश्नच आहे.

आजकाल

# मराठा समाज निव्वळ राजकारण करत नाही

वरुणराज भिडे हा चतुरस्त्र पत्रकार होता. तो उत्तम वार्ताहर, संपादक आणि अभ्यासू होता. १९९० च्या दशकात तो मुंबईला आला. त्यावेळी त्याची आणि माझी मैत्री झाली. तो राजकीय वार्ताहर होता परंतु त्याने मुंबईतल्या पुतळ्यांवर एक लेखमाला लिहीली होती. रघुवीर तळाशिलकर यांच्याकडून त्यासंबंधातला तपशील त्याला मिळाला. वरुणराजला तळाशिलकरांची ओळख मी करुन दिली आणि त्यानंतरच्या भेटींतही मी त्याच्या सोबत होतो. असो.




१९९५ साली सेना-भाजप युतीचं सरकार स्थापन झालं. त्यावेळी प्रताप आसबे, वरुणराज भिडे आणि मी तिघांनी मिळून विधानसभेतल्या २८७ आमदारांच्या जातींच्या नोंदी केल्या. प्रेसरुममध्ये गप्पाटप्पा करताना सहजपणे. आमच्या असं ध्यानी आलं की १९९५ साली पहिल्यांदाच आमदारांमध्ये म राठ्यांची संख्या सर्वाधिक होती.

**सुनील तांबे**

मात्र मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, ऊर्जा मंत्री, सहकार मंत्री, पाटबंधारे मंत्री, सार्वजनिक बांधकाम मंत्री, नगरविकास मंत्री मराठा नव्हता. हेही पहिल्यांदाच घडलं होतं.

राजकारण हा मराठा समाजाचा एक कलमी कार्यक्रम आहे अशी अनेकांची समजूत आहे. त्याला वास्तवाचा आधार कमी आहे. मराठा पुढाऱ्यांच्या नातेवाईकांनी व्यावसायिक कर्तबगारी, शिक्षण, वैयक्तीक प्रगती साधलेली दिसते.

उदाहरणार्थ धुळे जिल्ह्यात चुडामण आनंदा पाटील नावाचे पुढारी होते. शिक्षण अर्धवट सोडून त्यांना गिरणीत काम करावं लागलं. त्यांनी कामगार संघटना बांधली. वैयक्तिक सत्याग्रहात आणि 'चले जाव' चळवळीत तुरुंगवास भोगला. १९५२ आणि १९५७ मध्ये ते विधानसभेत व त्यानंतर तीनदा लोकसभेत निवडून गेले. त्यांची मुले उच्चशिक्षित डॉक्टर, इंजिनिअर, आय.ए.एस. झाली. त्यांपैकी इंजिनिअर असलेले रोहिदास पाच वेळा विधानसभेवर आणि एकदा विधान परिषदेवर निवडून गेले. मंत्री झाले. या कुटुंबाला राजकारणी कुटुंब म्हणायचं की बहुविध उच्च शिक्षण घेतलेलं, व्यक्तिगत गुणांवर प्रगती कणारं कुटुंब म्हणायचं?

शरद पवारांचे वडील गोविंदराव जिजाबा पवार हे नीरा कॅनॉल सोसायटीचे सेक्रेटरी म्हणून काम करणारे, सहकारी चळवळीतील सुरुवातीचे कार्यकर्ते होते.

ऊस बागायतदारांनी स्वतःचे साखर कारखाने काढावे, असा ठराव ज्या बागायतदार परिषदेत झाला त्या कार्यकारिणीत गोविंदराव होते. भवानीनगरच्या कारखान्याचे ते एक प्रवर्तक होते. शरद पवार वगळले तर त्यांच्या सर्व मुलांनी व्यवसाय, उद्योग, सामाजिक कार्यात स्वबळावर कर्तृत्व गाजवलं. या कुटुंबाला राजकारणी कुटुंब म्हणायचं की बहुविध उच्च शिक्षण घेतलेलं, वैयक्तीक गुणांवर प्रगती करणारं कुटुंब म्हणायचं?

ऊस उत्पादक, सहकारी साखर कारखाने ही मराठा लॉबी आहे असं म्हटलं जातं. त्यात तथ्य आहे परंतु टीका करण्यासारखं काहीही नाही. सर्वाधिक मराठा शेतकरी आहेत. ऊस उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये मराठ्यांची संख्या अधिक आहे. साहजिकच ऊस प्रक्रिया उद्योगात, त्या उद्योगाच्या संस्थांमध्ये त्यांची संख्या अधिक असणं स्वाभाविक आहे. चर्मोद्योगात चांभारांची संख्या असेल, विणकर सोसायटीत साळी, कोष्टी अधिक संख्येने असतील. मराठा घराणी महाराष्ट्रावर राज्य करतात असं म्हटलं जातं. परंतु या घराण्यांचा प्रभाव एखाद्या तालुक्या पुरता वा फार तर जिल्ह्यापुरता असतो. तो केवळ जातीच्या आधारवर नसतो. तर त्यांनी जे संस्थांचं जाळं उभारलेलं असतं त्यामुळे असतो.

मराठा समाजाच्या राखीव जागांच्या प्रश्नावर महाराष्ट्रात गेली काही वर्षं घमासांग चर्चा होते आहे. पण आयामांवर वा मितींवर चर्चा झालेली नाही. केवळ मराठाच नाही तर वंजारी, लेवा पाटील, शिंपी, सुतार, बंजारा, नवबौद्ध सर्वच जातींतील राजकारण्यांवर आम्ही चर्चा करायचो. वरुणराज सोबतच्या गप्पांमध्ये राजकारणाचे, राजकीय पुढाऱ्याचे कौटुंबिक, शैक्षणिक, व्यावसायिक असे अनेक पैलू ध्यानी यायचे. आणि राजकारणाची समज विस्तारायची.

**साभार**

## भावपूर्ण श्रद्धांजली

सर्वसामान्यांच्या हितासाठी धडधडणारी तोफ आज थंडावली,
श्रीमती मीनाक्षीताई आज इहलोकी झाली
आम्हांवर वटवृक्षासारखी तिची होती सावली
सुशिक्षित, प्रतिष्ठीत व राजकीय घराण्यात त्यांचा जन्म झाला,
राजकारणाचा वारसा त्यांना, त्यांच्या
आजोबांकडून वडिलांकडून लाभला,
एक ध्येयवादी पूरोगामी विचारांची रणरागिणी ती बनली
प्रथम तीने सरपंच बनून, गावाची सूत्र आपल्या हाती घेतली
तेव्हापासून जनहिताच्या कामासाठी ती मग्न होऊ लागली
अलिबाग तालुक्यातील जनतेच्या गळ्यातील
जणू ती ताईत बनली
१९९२ मध्ये रायगड जिल्हा परिषदेवर
त्यांची भरघोस मतांनी निवडून झाली,
१९९५ मध्ये अलिबाग उरण मतदार संघातून
त्यांनी आमदार म्हणून बाजी मारली
१९९९ साली बंदर खारभूमी मत्स्य विभागाच्या
मंत्री पदावर विराजमान झाली
आपल्या न्याय हक्कासाठी मोर्चे निदर्शने करून
उपोषणास बसली,
दिनदुबळ्या अडल्या नडल्याच्या मदतीला धावून गेली
अशी ही मायेची मायमाऊली आज दिगंतीच्या प्रवासाला निघाली
वक्तृत्व त्यांचे वाखाणण्यासारखे होते
कर्तृत्व त्यांचे जनहितासाठी होते
ती शेतकरी कामगार पक्षाला उभारी देऊन गेली
करू या आपण सारेजण प्रार्थना श्रीप्रभूजीला
ईश्वरचरणी चिरशांती लाभो आमच्या मीनाक्षीताईच्या आत्म्याला
काळाने आमची सर्वगुण संपन्न असणारी
मीनाक्षी ताईला हिरावून का घेतली

- लवेंद्र मोकल,
अध्यक्ष को.म. शाखा पेण
मोबा. ९९२१९७३८५६

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**तीन एप्रिल**

**१८८२:-** 'वीरधवल' आणि 'सोनेरी टोळी' या कादंबऱ्या लिहिणारे द्वारकानाथ माधव पितळे म्हणजेच 'नाथमाधव' यांचा जन्म. अवघ्या तेविसाव्या वर्षी झालेल्या अपघातामुळे ते लेखनाकडे वळले आणि २४ सामाजिक कादंबऱ्या, १२ ऐतिहासिक कादंबऱ्या, १० नाटके, 'बोध शतक' व 'रत्नाकर' हे काव्यसंग्रह अशी त्यांची साहित्यसंपदा ४६ वर्षाच्या आयुष्यात बहरली. नीतीइतकेच अनीतीचेही चित्रण त्यांनी केले. **१८९५:-** इतिहास, धर्म, शिक्षण या विषयासंबंधीचे लेखक कृष्णराव भाऊराव बाबर यांचा जन्म. डेप्युटी एज्युकेशन इन्स्पेक्टर असल्याने शिक्षणासंबंधी अनेक पुस्तके लिहिली. त्यामध्ये 'परीक्षेची तयारी', 'एक नमुनेदार विद्यार्थी', 'विद्यार्थ्यांचा आरसा', 'विद्यार्थ्यांची करमणूक' तसेच 'आपली पत','आपणाला मिळालेले स्वातंत्र्य', 'काम धेनू','नशिब आणि इतिहास दर्शन' ही मालिका याशिवाय १००० मधील स्पूट व शिक्षण विषयक लेख त्यांनी लिहिले. **१८९९:-** ख्यातनाम पत्रकार, संपादक लेखक पां. वा. गाडगीळ यांचा जन्म. अखंड वाचन आणि चिंतन, विविध विषयांवर लेखन अशी त्यांची कारकीर्द होती. 'तिसऱ्या महायुध्दाची पार्श्वभूमी', 'भारत-चीन संघर्षाचे स्वरुप', 'रशियन राज्यक्रांती' अशी माहिती पर वैचारिक पुस्तके तसेच 'गीता तत्त्वमंजिरी' हे चिंतन, 'खग्रास प्रभाकर' ही कांदबरी आदी २० पुस्तके त्यांनी लिहिली. **१९२२:-** लेखक, साहित्य विशारद दत्तात्रेय विश्वनाथ ताम्हनकर यांचा जन्म. ह्यांच्या लेखन संपदेत 'श्री गुरुचरित्र लघुसंक्षेप' आणि 'विचार सुवर्ण' हा दिनविशेष स्वरुपाचा ग्रंथ अशी यांची साहित्य संपदा. **१९२७:-** डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'बहिष्कृत भारत' या पाक्षिकाचा नमुना अंक या दिवशी बाहेर आला. १९३१ : कथा, कादंबरीकार उदय जयकृष्ण शेळके यांचा जन्म वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथे ८ ऑक्टोबर १९३१ रोजी झाला. शिक्षण पूर्ण झाल्यावर अमरावीच्या हिंदुस्थान या दैनिकात सहसंपादक होते. पुढे डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांच्या तपोवन या कुष्ठरोग्यांच्या संस्थेत मुद्रणालयात व्यवस्थापक म्हणून कार्यरत होते. लेखनाची सुरूवात कथालेखनाने केली. 'सत्यकथा' या मासिकात त्यांच्या कथा प्रसिद्ध झाल्या. 'शिळान' हा त्यांचा पहिला कथासंग्रह. त्यातील वैदर्भीय ग्रामीण जीवनाच्या सूक्ष्म चित्रणामुळे आणि वैदर्भीय बोलीच्या वापरामुळे वैशिष्ट्यपूर्ण ठरला. ३ एप्रिल १९९२ त्यांचे निधन झाले. **१९३१:-** लेखक, पत्रकार वैकुंठ गणपतराव इंगळे यांचा जन्म. ह्यांचा 'समाजवाद' हा ग्रंथ प्रकाशित झाला असून वृत्तपत्रातून प्रासंगिक लेखन त्यांनी केले आहे. **१९३९:-** लेखिका बालसाहित्यिका वर्षा सुधाकर प्रभू यांचा जन्म. 'शालेय दैनंदिन परिपाठ' या पुस्तका सह काही बालसाहित्य त्यांचे प्रकाशित झाले आहे. **१९४१:-** साहित्यिक डॉ. कृष्णराव पंढरीनाथ देशपांडे यांचा जन्म. ह्यांच्या लेखनसंपदेत 'अग्निकंकण' ही राजगुरुंच्या जीवनावर कादंबरी. तसेच 'अग्निफुले', 'आज्ञाधारकांच्या कथा', 'खांडेकरांचे समाज चिंतन', 'सर्वज्ञ चक्रधर','संत दामाजी' तसेच 'दशकुमार चरित्रम्' या अनुवादीत ग्रंथ तसेच यांच्या लघुचरित्रात 'दीनांची माऊली' हे सावित्रीबाई फुलेचे चरित्र, 'धैर्यमेरुंच्या कथा', 'ध्येय निष्ठांच्या कथा', 'पुराण कथामाला','महानुभावांचे साती ग्रंथ' हा पी एच डी ला प्रबंध, १००० पृष्ठांचा 'महाराष्ट्र दर्शन' ह्या ग्रंथासह 'न्यायदंड' ही एकांकिका. 'मातृकथा' मधून वेदकाळ ते पुराण काळातील भारतीय स्त्रियांच्या संस्कारक्षम कथा तसेच मानवतेच्या कथा. 'मॅरिशस' हे प्रवासवर्णनात्मक पुस्तकांसह 'मास महिना' मधून प्रत्येक महिन्याची महती. 'राज्यारोहण' ही शिवराज्याभिषेकावर कुमार कादंबरी, याशिवाय समर्थ रामदास, कवी वाल्मिकी ह्यांची लघुचरित्रे अशी विपूल साहित्यसंपदा त्यांच्या नावावर आहे. **१९४३:-** आकाशवाणीवरील मान्यताप्राप्त कवी, चित्रपट कथालेखक रमेश वसंत पेठे यांचा जन्म. 'बये बये दार उघड' हा विनोदी कथासंग्रह, 'स्वयंवर झाले सीतेचे' ह्या विनोदी नाटकासह कविता, बालनाट्य अशा स्वरुपाचे त्यांचे लेखन प्रसिध्द. **१९४६:-** ज्येष्ठ वृत्तपत्रलेखक विठ्ठलराव शं. पवार यांचा जन्म. 'विक्रमी पत्रलेखकफ या पुरस्काराने सन्मानित झालेल्या पवारांनी दिवाळी अंकातून लेख व अध्यात्मिक कथा लेखन केले. **१९५१:-** चित्रपट कथा, पटकथा, संवाद मुकेश फुलचंद लांजेवार यांचा जन्म. 'बेकारी' ही त्यांची नाटिका आकाशवाणीवर प्रकाशित झाली असून 'आरोही' ही कादंबरी त्यांची प्रकाशित झाली आहे. **१९५२:-** 'सारथी' नावाचे साप्ताहिक शां. ब. जेथे यांनी सुरु केले. **१९६७:-** कवी, अनुवादक देविदास लक्ष्मण महाजन यांचे निधन. 'श्री नामदेव महाराजांचे काव्यमय चरित्र', 'अपरोक्षानुभूतिसार','देवी महात्म्यसार' इत्यादी ग्रंथ त्यांनी लिहिली. **१९८५:-** प्राच्यविद्या संशोधक, नाणकशास्त्राचे व्यासंगी डॉ. वासुदेव विष्णू मिराशी यांचे निधन. जवळपास ४००हून अधिक संशोधनलेख त्यांनी लिहिले होते. त्यापैकी काहींची पुस्तके झाली. **१९९०:-** देशभक्तीपर गीते लिहिणारे आर. एन. पराडकर यांचे निधन. **१९९२:-** कथा-कादंबरीकार उध्दव जयकृष्ण शेळके यांचे निधन. 'धग' या गाजलेल्या कादंबरीसह तीस कथासंग्रह आणि काही संकीर्ण साहित्य त्यांचे प्रसिध्द. **१९९६:-** व्यंगचित्रकार वसंत गवाणकर यांचे निधन.

**संजय वझरेकर**
९९७५५७६६७५




# शिंदेंच्या पाच जागा धोक्यात

## भाजपचा विरोध कायम, जागा पडणार की पाडणार?

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

**राज्यात ४५ पेक्षा जास्त खासदार निवडून आणायचे लक्ष ठेवलेल्या महायुतीमध्ये सर्वकाही आलबेल असल्याचे दिसत नाही. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात अनेक ठिकाणी जगावाटावरून महायुतीत तिढा निर्माण झाला आहे. तर काही ठिकाणी उमेदवार जाहीर होऊन देखील स्थानिक कार्यकर्त्यांकडून उमेदवाराबाबत नाराजी व्यक्त होत आहे. त्यातल्या त्यात शिंदेंच्या शिवसेनेच्या काही उमेदवारांना भाजपचा अजूनही विरोध असून त्या ठिकाणी उमेदवार बदलण्याची मागणी केली जात आहे.**

एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आतापर्यंत आठ उमेदवार जाहीर करण्यात आलेल आहेत. महायुतीचे जागावाटप अद्याप जाहीर झाले नसले तरी शिंदेंच्या वाट्याला १२ किंवा १३ जागा येणार असल्याची माहिती आहे. शिंदेंनी चार ते पाच ठिकाणच्या खासदारांना पुन्हा तिकीट देऊ नये अशी भूमिका भाजपने घेतली होती. त्यामध्ये नाशिक, हातकणंगले, यवतमाळ-वाशिम आणि हिंगोलीचा समावेश होता. तर ठाण्याची जागा कोणत्याही परिस्थितीत आपल्याला मिळावी असा आग्रह भाजपचा आहे.

### हेमंत पाटील यांना विरोध

**महायुतीतील सर्वाधिक वादग्रस्त ठरू शकणारी जागा म्हणजे हिंगोली लोकसभा मतदारसंघ. हिंगोलीमधून शिवसेनेने हेमंत पाटलांच्या नावाची जरी घोषणा केली असली तरी, त्यांना असणारा भाजपचा विरोध मात्र कायम आहे. हेमंत पाटलांबद्दल लोकांमध्ये नाराजी आहे, त्यामुळे त्यांची जिंकण्याची शक्यता कमी असल्याचा अहवाल असल्याचे भाजपकडून स्पष्ट करण्यात आले होते. ही जागा जर भाजपच्या वाट्याला आली तर भाजप सहजपणे खासदार निवडून आणेल असा विश्वासही व्यक्त करण्यात आला.**

**धैर्यशील मानेंना विरोध**

जी गत हिंगोलीची तीच गत आता हातकणंगल्याची आहे. हातकणंगल्यातून शिवसेनेने धैर्यशील माने यांच्या नावाची घोषणा केली आहे. पण त्यांना भाजपचा आधीपासूनच विरोध होता. हातकणंगल्याची जागा ही भाजपने लढवावी अशी मागणी कार्यकर्त्यांकडून होत होती. त्यातच आता हातकणंगलेमधून इच्छुक असलेले भाजपचे नेते संजय पाटील हे धैर्यशील माने यांच्यावर नाराज आहेत. जोपर्यंत सन्मान नाही तोपर्यंत धैर्यशील मानेंचा प्रचार करणार नाही अशी भूमिका संजय पाटील यांनी घेतली आहे.



**गोडसेंना विरोध**

हेमंत गोडसेंच्या नावाला असलेला विरोध लक्षात घेता शिवसेना शिंदे गटाने अद्याप नाशिकच्या उमेदवारीची घोषणा केली नाही. आपले तिकीट कापले जाणार हे लक्षात येताच हेमंत गोडसेंनी अनेकदा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली आहे. पण तरीही त्यांना असलेला विरोध कमी करण्यास भाजपचे कार्यकर्ते तयार नाहीत. त्यातच आता नाशिकची जागा ही राष्ट्रवादीला जाणार असून त्या ठिकाणी छगन भुजबळ हे निवडणूक लढवतील असे म्हटले जात आहे.

**गवळींचीं उमेदवारी धोक्यात?**

शिंदेच्या आणखी एका नावाला भाजपचा कडाडून विरोध आहे आणि ते नाव म्हणजे यवतमाळ वाशिमच्या खा. भावना गवळी. या मतदारसंघात खासदार भावना गवळी पाच वेळा निवडून आल्या आहेत. त्यामुळे या निवडणुकीतही आपल्याला उमेदवारी मिळेल असा त्यांना आत्मविश्वास आहे. मात्र, आता निवडणुकीत उमेदवारी मिळवताना त्यांना संघर्ष करावा लागत आहे. गवळी यांच्या नावाला भाजपचा विरोध असल्याने त्यांनी संजय राठोड यांचे नाव पुढे केल्याची चर्चा आहे. गवळींच्या विरोधात लोकांमध्ये नाराजी असल्याचं भाजपकडून सांगण्यात येतंय. त्याचमुळे याकाळात भाजप आणि शिंदे गटाकडून गवळींसह संजय राठोड यांच्या नावाची उमेदवार म्हणून चाचपणी करण्यात आली. मात्र अद्यापही उमेदवारीचा तिढा सुटला नाही.

# ठाणे-कल्याण जागेवरुन शिवसेना-भाजपत रस्सीखेच

**। ठाणे । वृत्तसंस्था ।**

लोकसभेची रणधुमाळी सुरू झाली आहे. त्यातच महायुती आणि महाविकास आघाडीत आजही जागा वाटपावरून एकमत होत नसल्याचे चित्र दिसून येत आहे. ठाणे आणि कल्याण लोकसभेवरूनदेखील शिवसेना भाजपत रस्सीखेच सुरू आहे

ठाणे लोकसभेवर शिवसेनेकडून दावा करण्यात येत आहे. त्यानुसार शिवसेनेने शिंदे गटाकडून विभागावर बैठका घेण्यात येत आहे. शनिवारी(दि.३०) टेंभीनाका येथील आनंदाश्रमात शिवसेनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत ठाणे लोकसभेवर दावा करीत, स्वपक्षीयालाच उमेदवारी मिळावी, अशी भूमिका पदाधिकाऱ्यांकडून घेण्यात आली आहे.

लोकसभा निवडणुकीची धामधूम सुरू झाली असून महाविकास आघाडी आणि महायुतीकडून अनेक उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे. असे असले तरी दुसरीकडे अनेक जागांवरून मतभेद सुरू असून जास्तीत जास्त जागा आपल्या पदरात पडाव्यात, यासाठी दावे-प्रतिदावे करण्यात येत आहे.

शिवसेना ठाकरे गटाकडून ठाणे लोकसभेसाठी राजन विचारे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. त्यातच शिंदे सेनेकडून आणि भाजपकडून अनेकांची नावे यासाठी पुढे येत आहेत. भाजपकडून हा मतदारसंघ ताब्यात घेण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली जात आहे. मात्र, शिंदे सेना देखील हा मतदारसंघ सोडण्याच्या तयारीत नसल्याचे चित्र आहे.

शिवसेनेतील उठावानंतर राजकीय समीकरणे बदलली असली तरी ही जागा शिवसेनेलाच मिळावी, यासाठी मुख्यमंत्री शिंदे हे आग्रही आहेत. असे असतानाच, भाजपचे नवी मुंबईतील नेते गणेश नाईक अथवा त्यांचे माजी खासदार पुत्र संजीव यांच्यासाठी भाजपने या जागेवर दावा केला आहे. तसेच ही जागा मुख्यमंत्र्यांना सोडावी लागली तरी दोघांच्या सहमतीचा उमेदवार म्हणून संजीव नाईक यांनी धनुष्यबाण चिन्हावर ही निवडणूक लढवावी, असा प्रस्तावही मुख्यमंत्र्यांपुढे ठेवला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील संजीव नाईक यांच्याशी हातमिळवणी करीत याबाबत संकेत दिल्याची चर्चा आहे; परंतु या चर्चेमुळे ठाणे, नवी मुंबईतील मुख्यमंत्री समर्थक अस्वस्थ झाल्याचे चित्र आहे. त्यामुळे त्यांनी स्वपक्षातीलच पदाधिकाऱ्याला हे तिकीट दिले जावे, अशी भूमिका मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे मांडल्याचीही चर्चा आहे.

## ॲड. पाडवींचा ‘श्रीगणेशा’



**नंदुरबार :** काँग्रेसचे नेते तथा माजी मंत्री ॲड. के. सी. पाडवी यांनी लोकसभा निवडणुकीसाठी तीनदा उमेदवारी करून हॅटट्रिक पूर्ण केली आहे. मात्र तिन्ही वेळेस त्यांना अपयश आले. लोकसभा निवडणुकीतील अपयशी हॅटट्रिकनंतर मुलगा ॲड. गोवाल पाडवी यांना लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारीची संधी मिळाली आहे. केवळ संधीच नव्हे, तर थेट राजकीय प्रवेशाचा श्रीगणेशा लोकसभेच्या उमेदवारीने होणे, ही गोवाल यांच्यासाठी नशीब बलवत्तर असल्याचे मानले जाते.

## तुपकरांनी भरला उमेदवारी अर्ज

**बुलढाणा :** शेतकरी नेता लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरला आहे. शेतकरी नेते रविकांत तुपकर हे बुलढाण्यातून लोकसभा निवडणूक लढणार आहेत. सलग तीन टर्म खासदार असलेले शिवसेने उमेदवार प्रतापराव जाधव यांच्या विरोधात रविकांत तुपकर यांनी दंड थोपटले आहेत. रविकांत तुपकर सोमवारी (दि. १) उमेदवारी अर्ज दाखल करणार आहे. सामान्य शेतकऱ्यांचा मला पाठिंबा आगे, असे रविकांत तुपकर म्हणाले. मोठ्या संख्येने नागरिक, तरुण, महिला अर्ज भरण्यासाठी येणार आहे. नेता अशी असणार आहे.

## अमरावतीत तिरंगी लढत

**मुंबई :** अमरावती लोकसभा मतदारसंघ हा विदर्भातील एक महत्वाचा मतदारसंघ आहे जिथं नवनीत राणा विरुद्ध बळवंत वानखडे असा महायुती विरुद्ध महाविकासआघाडी यांच्यात सामना होणार आहे. या दोन उमेदवारी जाहीर झाल्यानंतर बच्चू कडूंच्या उमेदवाराची एन्ट्री झाली आहे. दिनेश बूब यांना प्रहार संघटनेचा उमेदवार म्हणून घोषित केले आहे. त्यामुळे अमरावतीची निवडणूक यंदा चांगलीच चुरशीची होऊ शकते.

## भुजबळांसह कुटुंबियांना नोटीस

**मुंबई :** महाराष्ट्र सदन बांधकाम घोटाळाप्रकरणी गुन्हा दाखल झालेल्या छगन भुजबळांसह कुटुंबीयांची सत्र न्यायालयाने निर्दोष मुक्तता केल्याने अंजली दमानिया यांनी या विरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. न्या. एस. एम. मोडक यांनी याची दखल घेत छगन भुजबळांसह पंकज व समीर भुजबळ यांना नोटीस बजावत चार आठवड्यांत भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश दिले.

# जळगावच्या राजकारणात भूकंप

**। जळगाव । वृत्तसंस्था ।**

ऐन लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपला जळगावात मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. भाजपचे खा. उन्मेष पाटलांनी संजय राऊतांची भेट घेतल्यानंतर मातोश्रीवर जाऊन उद्धव ठाकरेंची भेट घेतली आहे. त्यामुळे उन्मेष पाटील ठाकरेंच्या शिवसेनेच्या वाटेवर असल्याची चर्चा आहे. भाजपने तिकीट कापल्यामुळे उन्मेष पाटील नाराज आहेत. त्यामुळेच पाटील ठाकरेंच्या पक्षाच्या संपर्कात आहेत. यावेळी त्यांच्यासोबत करण पवारही उपस्थित होते. जळगावात मविआचे उमेदवार असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. दरम्यान, उन्मेष पाटील हे उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेत सुरक्षित नसल्याचा दावा भाजपचे महाराष्ट्राचे निवडणूक प्रभारी डॉ. दिनेश शर्मा यांनी केला आहे. मात्र, उन्मेष पाटलांबाबत उद्याच कळेल असे विधान संजय राऊत यांनी केले आहे.



उद्धव ठाकरेंच्या उपस्थितीत उन्मेष पाटील यांचा शिवसेना ठाकरे गटात पक्ष प्रवेश होण्याची शक्यता आहे. मातोश्रीवर उद्धव ठाकरे, संजय राऊत, उन्मेष पाटील, करण पवार आणि संपर्कप्रमुख संजय सावंत यांच्यात बैठक पार पडली.

जळगावमधून उन्मेष पाटील किंवा करण पवार यांना ठाकरे गटाची उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. पाटील यांनी चांगले काम केले आहे. अनेक वर्ष ते भाजपाचे काम करत आहेत, त्यांची प्रतिमा चांगली आहे, त्यांची उमेदवारी कापली अशी प्रतिक्रिया संजय राऊत यांनी दिली आहे.

# ‘१७ रुपयांची साडी दोन कोटींची गाडी’

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

लोकसभा निवडणुकीचे घोडेमैदान जवळ आले आहे. युती आणि आघाड्यांकडून प्रक्रिया वेगाने सुरु आहे. महाविकास आघाडी असो, की महायुती असो दोन्ही युती आणि आघाडीत कुरघोडी सुरु आहेत.



१७ रुपयांची साडी देऊन मेळघाटची बेइज्जत केली गेली. आपण दोन कोटींच्या गाडीत फिरायचे आणि १७ रुपयांच्या साडीने लोकांना गुलामीकडे नेण्याची व्यवस्था करायची. परंतु ही १७ रूपयांची साडी मत परिवर्तन करू शकत नाही, असा खरपूस समाचार बच्चू कडू यांनी राणा दाम्पत्याचा घेतला.

राणांनी मेळघाटमध्ये वाटलेल्या साड्यांवर बच्चू कडू यांनी जोरदार टीका केली. नवनीत राणाचा डिपॉझिट आम्ही जप्त करणार आहोत. आता तीर दूर गेलेला आहे. तो परत येणार नाही, असे ते म्हणाले.

महायुतीचा घटक पक्ष असलेल्या प्रहार जनशक्ती पक्षाने वेगळी भूमिका घेतली आहे. आ. बच्चू कडू यांनी भाजपच्या उमेदवार खा. नवनीत राणा यांचा प्रचार करणार नसल्याची भूमिका जाहीर केली आहे. त्यासाठी वेळप्रसंगी महायुतीतून बाहेर पडू पण राणांसाठी मत मागणार नाही, अशी रोखठोक भूमिका त्यांना मांडली. तसेच त्यांनी महायुतीला धक्का देत प्रहार पक्षाकडून दिनेश बुब यांना उमेदवारी जाहीर केली. आता या सर्व प्रकरणात नवनीत राणांवर घणाघाती हल्ले ते करत आहेत. यामुळे अमरावती लोकसभेच्या निवडणुकीच वातावरण तापलं आहे.

प्रहारचे उमेदवार दिनेश बुब यांच्या प्रचारार्थ बच्चू कडू यांनी कार्यकर्ता मेळावा घेतला. यावेळी कडू यांनी राणा दाम्पत्यावर सडकून टीका केली.

# अकोल्यात तिहेरी लढत

**। अकोला । वृत्तसंस्था ।**

अकोला लोकसभा मतदारसंघात तिहेरी लढत बघायला मिळणार आहे. भाजपा, मविआ आणि वंचितने आपले उमेदवार जाहीर केले आहेत. मात्र, मविआ आणि भाजपानं यंदा मराठा कार्डचा पत्ता टाकल्याने वंचितची चांगलीच गोची होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. त्यामुळे या तिहेरी लढतीत कोण विजयाचा एक्का ठरेल याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.या मतदारसंघातून भाजपाने माजी खा. संजय धोत्रे यांचे पुत्र अनुप धोत्रे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. तर वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी ऐनवेळी मविआशी काडीमोड करत स्वतंत्र निवडणूक लढणार असल्याचे जाहीर केले. तसेच मविआने डॉ. अभय पाटील यांना उमेदवारी दिली आहे. या तिन्ही उमेदवारांपैकी प्रकाश आंबेडकर हे जवळपास १२ व्यांदा निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. तर भाजपाचे अनुप धोत्रे आणि मविआचे डॉ. अभय पाटील हे पहिल्यांदाच लोकसभा निवडणुकीत आपले नशीब आजमावणार आहे.

यामुळे आता भाजपा आणि मविआ, वंचित याच्या तिहेरी लढत होणार आहे.

# उमेदवारी जाहीर होण्याआधीच प्रचार सुरू

**। नाशिक । वृत्तसंस्था ।**

नाशिक लोकसभा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट लढवणार अशी चर्चा आहे. नाशिक लोकसभा मतदारसंघात महायुतीकडून उमेदवार जाहीर झाला नसला तरी विद्यमान खा. हेमंत गोडसे यांनी प्रचार सुरू केला आहे. नाशिकची जागेवर छगन भुजबळ यांची उमेदवारी जवळपास निश्चित मानली जात असताना गोडसेंनी सुरू केलेल्या प्रचाराने महायुतीतील नेत्यांची डोकेदुखी वाढली आहे.




महाविकास आघाडीकडून राजाभाऊ वाजे यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

नाशिकमधून गोडसेंना उमेदवारी मिळेल अशी अपेक्षा होती. त्यात गोडसे यांची उमेदवारी भुजबळांच्या एंट्रीने अनिश्चित झाली. मात्र, या उमेदवारीबाबत घोळ कायम असताना हेमंत गोडसे आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी त्यांचा प्रचार देखील सुरू केला आहे. गोडसे यांनी छापलेल्या प्रचार पत्रकावर इच्छुक उमेदवार हेमंत गोडसे असा उल्लेख आहे.

**खा. गोडसे**

**हेमंत गोडसे यांनी प्रचाराला सुरुवात केल्याने महायुतीमधील घटक पक्ष असलेल्या भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील इच्छुकांची डोकेदुखी मात्र वाढले आहे. नाशिकच्या जागेवरील आपला दावा सोडायला तयार नसल्याने पक्षश्रेष्ठी देखील अडचणी झाले आहेत. मात्र, भुजबळ यांनी गोडसे यांच्या प्रचार आमच्यासाठी फायदेशीर ठरेल असा टोला लगावला.**

# आठवलेंनी सोडला शिर्डीचा हट्ट

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

शिर्डी लोकसभा मतदारसंघावर आरपीआय पक्षाकडून दावा करण्यात आला होता. मात्र, ही जागा शिवसेना शिंदे गटाने स्वतः कडे खेचल्याने केंद्रीय मंत्री आठवले नाराज होते. त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिर्डीच्या बदल्यात दिलेले आश्वासन जाहीर करत ते आश्वासन पाळतील अशी आशा आहे. डोंबिवलीत राज्यस्तरीय द्वितीय बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन रविवारी करण्यात आले होते. यावेळी आठवले यांना शिर्डी लोकसभा मतदारसंघाविषयी विचारणा केली. आठवले यांच्या आरपीआय पक्षाकडून



शिर्डी लोकसभा मतदारसंघावर दावा करण्यात आला होता.

आरपीआय महायुतीत आहे त्यांनी आमचा विचार केला आहे. मात्र, जागेची अडचण आहे असे आम्हाला सांगितले. शिर्डीच्या जागेसाठी आग्रही होतो. ती त्यांना सोडता आली नाही. मात्र बाकीचे आश्वासन त्यांनी दिलेले आहेत ते पाळतील अशी आम्हाला आशा आहे असे आठवले म्हणाले.

# शरद पवार पुन्हा उदयनराजेंना देणार धक्का?

**। सातारा । वृत्तसंस्था ।**

सातारा लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून उमेदवार कोण असणार? याबाबतचा सस्पेन्स अजूनही कायम आहे, कारण विद्यमान खा. श्रीनिवास पाटील यांनी प्रकृतीच्या कारणामुळे निवडणूक लढायला नकार दिला आहे. पाटील यांनी नकारामुळे शरद पवार साताऱ्यात नव्या उमेदवाराच्या शोधात आहेत, या जागेवरून पृथ्वीराज चव्हाण यांचे नाव समोर येत आहे. जयंत पाटील यांनी पृथ्वीराज चव्हाण यांची भेट घेतली, त्यामुळे या चर्चांना आखणी उधाण आले आहे.



साताऱ्याच्या उमेदवाराबाबत अखेर पृथ्वीराज चव्हाण यांनी खुलासा केला आहे. हा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसकडे आहे. ४८ पैकी जवळजवळ सर्वच जागांवर एकमत झाले आहे, सातारा हा मतदारसंघ राष्ट्रवादीचाच आहे, माझी जयंत पाटील यांच्याबरोबर चर्चा झाली आहे, हा निर्णय शरद पवारांना घ्यायचा आहे, असे पृथ्वीराज चव्हाण यांनी सांगितले.

मला आदेश दिला तर माझी लढायची तयारी आहे, पण हा निर्णय शरद पवारांना द्यायचा आहे, असे सूचक विधानही पृथ्वीराज चव्हाण यांनी केले आहे. शरद पवार जो उमेदवार देतील, त्याच्यामागे ताकदीने उभे राहू. हा मतदारसंघ तुतारीचा विषय आहे, तुतारीचा निर्णय त्यांनी घ्यायचा आहे. सातारा लोकसभा काँग्रेसने लढवावी म्हणून अजून प्रस्ताव आला नाही, जर आला तर विचार करू, अशी प्रतिक्रिया पृथ्वीराज चव्हाणांनी दिली. शशिकांत शिंदे यांचा निर्णय राष्ट्रवादीने घ्यायचा आहे, असंही पृथ्वीराज चव्हाण म्हणाले.

## नरसिंग उदगीरकर यांना तिकीट

**लातूर :** लातूर जिल्हा हा राज्याच्या राजकारणात महत्त्वाचा आहे. या जिल्ह्याने महाराष्ट्राला दोन मुख्यमंत्री दिले आहेत. ही जागा आपल्याच ताब्यात यावी, यासाठी प्रत्येकाचा आग्रह असतो. दरम्यान, वंचित बहुजन आघाडीनेदेखील या जागेवर आपला उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरवला असून या पक्षाने येथे नरसिंग उदगीरकर यांना तिकीट दिले आहे. निवृत्ती घेतल्यानंतर ते राजकारणात सक्रिय झाले होते. यावेळी वंचितने त्यांच्यावर विश्वास ठेवला आहे.

# शरद पवार माढ्यात टाकणार डाव

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

लोकसभानिवडणुकीतबारामती पाठोपाठ सर्वाधिक चर्चा माढ्याची सुरू आहे. राष्ट्रवादीचा बालेकिल्ला राहिलेल्या माढ्यात सध्याच्या घडीला भाजपचे रणजीतसिंह नाईक निंबाळकर खासदार आहेत. भाजपने पुन्हा एकदा त्यांच्यावर विश्वास दाखवला आहे. निंबाळकरांना उमेदवारी मिळाल्याने माढ्यातील भाजपच्या नेत्यांमध्ये नाराजी आहे. माढा मतदारसंघ राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांना सोडण्याची तयारी पवारांनी दाखवली होती. याबद्दल जानकर यांची पवारांसोबत चर्चाही झाली. पण जानकर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीला गेले. त्यांनी महायुतीसोबत राहण्याचा निर्णय घेत परभणीची जागा पदरात पाडून घेतली.

नाईकनिंबाळकर यांना उमेदवारी देण्यात आल्याने मोहिते पाटील कुटंब नाराज आहे. राष्ट्रवादीचे नेते रामराजे निंबाळकर यांचाही रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांच्या उमेदवारी विरोध आहे. पण मोहिते पाटील कुटुंब भाजप सोडण्यास तयार नाहीत. त्यामुळे शरद पवार सध्या माढ्यासाठी उमेदवाराच्या शोधात आहेत. संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांनी दोनदा शरद पवारांची भेट घेतली. दोन्ही नेत्यांची एक बैठक दिल्लीत झाली.

शरद पवार आणि प्रवीण गायकवाडयांच्यात माढा लोकसभेतून उमेदवारीबद्दल चर्चा झाली. मोहिते पाटील माढा लढवणार नसतील, तर मी निवडणूक लढण्यास तयार असल्याचे प्रवीण गायकवाड यांनी पवारांना सांगितलं. त्यामुळे शरद पवार माढ्यात काय निर्णय घेतात याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# महायुतीत जागांचा तिढा कायम

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

महायुतीत अजूनही काही जागांवर तिढा कायम आहे. यवतमाळ-वाशिममध्ये कोणाला उमेदवारी मिळणार हे अजून स्पष्ट होऊ शकलेले नाही. त्यामुळे यवतमाळमध्ये भावना गवळींचे कार्यकर्ते संतप्त झालेले आहेत. दरम्यान, संभाजीनगर, नाशिक, कल्याण डोंबिवली, ठाणे सिंधुदुर्गाच्या जागेवरही तोडगा निघालेला नाही. त्यामुळे महायुतीत बऱ्याच ठिकाणी नाराजीचा सूर आहे.

**वाशिममध्ये दोन नावे चर्चेत**

वाशिम यवतमाळच्या लोकसभेसाठी उमेदवारी अर्ज भरण्यासाठी ४ एप्रिल ही शेवटची तारीख आहे. मात्र, ३ दिवस शिल्लक असतानाही उमेदवारी जाहीर न झाल्याने, सामूहिक राजीनामे देण्याचा इशारा पदाधिकाऱ्यांनी दिला. वाशिम-यवतमाळमध्ये भावना गवळींसह मंत्री संजय राठोडांचंही नाव चर्चेत आहे.




गवळींविरोधात सर्व्हे असून राठोडांनी लढावे अशी चर्चा शिंदे गटात झाल्याचं सूत्रांकडून समजतं आहे. त्यामुळेच शिंदे गटाच्या पहिल्या यादीतही भावना गवळींचं नाव आलेलं नाही.

## ठाण्यात म्हस्केंचे नाव आघाडीवर

### ठाणे-कल्याणमध्ये सस्पेंस

**फक्त वाशिम यवतमाळच नाही तर महायुतीत आणखी काही जागांचा तिढा कायम आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगरची जागा शिंदेंच्या शिवसेनेकडे गेल्याचं कळतं आहे. मंत्री संदीपान भुमरेंची उमेदवारी निश्चित झाल्याची माहिती आहे. ठाण्याची जागाही शिंदे गटाकडेच राहणार असून आमदार प्रताप सरनाईक आणि नरेश म्हस्केंचं नाव चर्चेत असून म्हस्केंचं नाव आघाडीवर आहे.**

**नाशिकमध्ये रस्सीखेच**

नाशिकच्या जागेसाठी विद्यमान खासदार हेमंत गोडसेंनी प्रचार सुरु केला आहे. तर इथं भाजपचे ३ आमदार आणि १०० नगसेवक असल्याचं सांगून भाजपनंही दावा केलाय. आणि ऐनवेळी भुजबळांनीही एंट्री केली आहे. दिल्लीत माझ्या नावाची चर्चा झाली असून अजित पवार गटाला जागा मिळावी असं भुजबळ म्हणाले आहेत. मात्र नाशिकची जागा आमचीच असल्याचं सांगून नाशिकचा सोडणं शक्य नसल्याचं शिंदे गट म्हणत आहे.

रत्नागिरी सिंधुदुर्गाच्या जागेवरुन अजूनही अंतिम तोडगा निघताना दिसत नाही.

## दक्षिण मध्य मुंबईत

# शिवसेनेत वाद

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

दक्षिण मध्य मुंबई मतदारसंघात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत वाद उफाळून आला आहे. खासदार राहुल शेवाळे आणि आमदार सदा सरवणकर यांच्यातील वादामुळे गटबाजी सुरू आहे. याला कंटाळून विभाग क्रमांक १२ चे विभागप्रमुखे गिरीश धानुरकर यांनी पदाचा राजीनामा दिला आहे.

माहीम, धारावी, वडाळा या तीन विधानसभेचे प्रमुख गिरीश धानुरकर यांनी शिवसेनेचे मुख्य नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहून आपला राजीनामा दिला आहे. सदा सरवणकर यांच्या शिफारशीमुळेच धानुरकर यांची विभागप्रमुख पदावर नियुक्ती करण्यात आली होती. गेल्या काही महिन्यांपासून सदा सरवणकर व त्यांचे पुत्र माजी नगरसेवक समाधान सरवणकर हे आपल्याला पदाधिकाऱ्यांमार्फत मानसिक त्रास देत असल्याचे धानुरकर यांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. . त्यामुळे विभागप्रमुख पदाचा राजीनामा देत असल्याचे या पत्रात म्हटले आहे.

निवडक

## पालखी सोहळा संपन्न

**दापोली :** कोकणात विशेषतः रत्नागिरी जिल्ह्यात शिमगा सण मोठ्या प्रमाणात साजरा होतो. कोकणात हा सण सुमारे १५ दिवस साजरा केला जातो. होळीच्या वेळी ग्रामदेवतेची पालखी निघते. कोकणपट्ट्यात प्रसिद्ध असलेला हा पालखी उत्सव पाहण्यासाठी देशविदेशातून लोक येतात. असाच एक पालखी सोहळा रत्नागिरी जिल्ह्यातील दाभीळ मोरेवाडी (दापोली) येथे मोठ्या जल्लोष उत्साहमय वातावरणात साजरा करण्यात आला.

## खेळण्यांची दुरूस्ती

**पनवेल :** अनेक महिन्यांपासून खांदा वसाहत सेक्टर ९ मधील गार्डनमधील अनेक खेळणी तुटल्याने लहान मुले गार्डनमध्ये येत नव्हती. मात्र, पालिकेच्यावतीने नवीन खेळणी बसवल्याने पुन्हा लहान मुले खेळण्याकरता येऊ लागली आहेत. परंतु, खांदा वसाहतीमध्ये आणखी दोन ते तीन गार्डन आहेत. त्या ठिकाणी सुध्दा खेळणी तुटली आहेत. मात्र, आचारसंहिता असल्याने नविन खेळणी येण्यास विंलब लागणार असून लवकरात लवकर लावण्याची मागणी होत आहे.

## पत्रकारांचा सन्मान सोहळा

**नवी मुंबई :** ठाणे जिल्हा पत्रकार संघाचा भव्य पत्रकार मेळावा मोठ्या दिमाखदार पद्धतीने संपन्न झाला. या मेळाव्यात ६० वर्षांपासून आजतागायत पत्रकारिता करणारे पीटीआय, यूएनआय या राष्ट्रीय वृत्तसंस्थांचे ज्येष्ठ पत्रकार एस. रामकृष्णन यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. जिल्ह्यातील ११ ज्येष्ठ पत्रकार, छायाचित्रकार, कॅमेरामॅन, पत्रकार कल्याण निधी,अधिस्वीकृती समिती व राज्यस्तरीय आरोग्य समितीवर नियुक्त झालेल्या आठ पत्रकारांना गौरविण्यात आले.

## टॅक्सी स्टँडसाठी साकडे

**नेरळ :** नेरळ येथून माथेरान पर्यटन स्थळी पर्यटकांची सुखरूप प्रवास करणाऱ्या नेरळ येथील टॅक्सी स्टँडचे नूतनीकरण करण्यात यावे, अशी मागणी टॅक्सी संघटनेने किरण ठाकरे यांच्याकडे केली आहे. त्याबाबत ठाकरे यांच्या कार्यालयात विशेष बैठक घेण्यात आली आणि त्यावेळी टॅक्सी चालक आणि संघटनेचे पदाधिकारी यांनी ही मागणी केली होती. त्यांनी ही बाब महाराष्ट्र राज्याचे बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली असल्याचे सांगण्यात आले.

## जेएनपीटीची उल्लेखनिय कामगिरी

**उरण :** भारतातील अग्रगण्य कंटेनर बंदरांपैकी एक असलेल्या जवाहरलाल नेहरू पत्तन प्राधिकरणाने२०२३-२४ या आर्थिक वर्षात ६.४३ दशलक्षची आतापर्यंतची सर्वाधिक थ्रूपुट नोंदवून ऐतिहासिक टप्पा गाठला. २०२२-२३ चा ६.०५ दशलक्ष अंक ओलांडून बंदराने आपला यशस्वी प्रवास सुरू ठेवला आहे. त्या तुलनेत, मागील वर्षीच्या याच कालावधीत एकूण थ्रूपुटमध्ये लक्षणीय ६.२७% वाढ नोंदवून विक्रमी थ्रूपुट नोंदविला गेला.

# भूसंपादन कायद्यानुसार नुकसान भरपाई द्या

### अन्यथा आमरण उपोषणाला बसण्याचा शेतकऱ्यांचा इशारा

**। उरण । प्रतिनिधी ।**

तालूक्यातील सुधाकर मुकुंद नाईक, विजय मुकुंद नाईक, संगीता विलास घरत हे शेतकरी हरिश्चंद्र पिंपळेश्वर येथील १ एप्रिल १९५७ च्या अगोदरपासून ताबे, कब्जा, वहिवाट मालकीने संरक्षित कुळ असून विरार-अलिबाग कॉरीडोर प्रकल्पबाधित आहेत. भूसंपादन कायदा २०१३ प्रमाणे जमिनीच्या गुंठयाचे भाव बाजारमुल्याप्रमाणे १५ दिवसाच्या आत द्यावे. अन्यथा प्रकल्पबाधित शेतकरी पनवेल येथे आमरण उपोषणाला बसणार असल्याचा इशारा संबंधित प्रशासनाला देण्यात आला आहे.




शिवडी, न्हावा सेतुच्या भूसंपादनात शेतकऱ्यांना प्रतिगुंठे ५० हजार भाव देऊन फसवणूक करणाऱ्या पुनर्वसन अधिकाऱ्यांना प्रतिगुंठे ९३ लाख भाव द्यावा, असा निर्णय मा. उच्च न्यायालयाने अलिकडेच दिला आहे. त्यानुसार जमिनीचा बाजारभावाने पुनर्वसन हे कायद्याने मागण्याचा अधिकार शेतकऱ्याचा आहे. हे सरकारी अधिकाऱ्यांनी लक्षात घ्यावे. कसत असलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यालाच मिळावा. इव्हॅक्यू म्हणून आलेल्या गेलाराम भुरोमल या बोगस व्यक्तीला दिल्यास या व्यक्ती विरोधात तसेच पुनर्वसन अधिकारी, मा. जिल्हाधिकारी यांच्या विरोधात फसवणूकीचा गुन्हा दाखल करु, याची नोंद घ्यावी. जमिनीचा ताबा, कब्जा, वहिवाट मालकी बद्दल मा. जिल्हाधिकारी रायगड, तहसिलदार पनवेल, प्रांत पनवेल, तलाठी सजा विंधणे यांनी तत्काळ पंचनामे करुन भूसंपादन कायदा २०१३ प्रमाणे पुनर्वसन करावे, असे आदेश शासनाने द्यावेत. अशी मागणी शेतकऱ्यांनी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल, रायगडचे जिल्हाधिकारी, प्रांत अधिकारी, तहसीलदार यांच्याकडे पत्रव्यवहाराद्वारे केली आहे.

तसेच, जमिनीचे प्रतिगुंठा ५ कोटी रुपये बाजारमुल्याप्रमाणे २६.३० गुंठयांचे एकूण १ अरब ३१ कोटी ५० लाख रुपये एवढी किंमत आहे. सरकारी नोकऱ्या, विकसित भूखंड, व्यावसायिक पुनर्वसन भूसंपादन कायदा २०१३ प्रमाणे जमिनीच्या गुंठयाचे भाव बाजारमुल्याप्रमाणे १५ दिवसाच्या आत द्यावे. अन्यथा सुधाकर नाईक, विजय नाईक, संगीता घरत हे प्रकल्पबाधित शेतकरी पनवेल येथील मेट्रो सेंटर येथे आमरण उपोषणाला बसणार असल्याची बाब शेतकऱ्यांनी प्रशासनाला केलेल्या पत्रव्यवहारातून समोर आली आहे.

> विरार-अलिबाग कॅरिडॉर भूसंपादनामुळे आम्ही प्रकल्पबाधित होत आहोत. त्यामुळे टाकीगाव-दिघोड येथील जमिनीचे प्रतिगुंठा ५ कोटी बाजारमुल्याप्रमाणे २६.३० गुंठयांचे १ अरब ३१ कोटी ५० लाख एवढी किंमत आहे. सरकारी नोकऱ्या, विकसित भूखंड, व्यावसायिक पुनर्वसन भूसंपादन कायदा २०१३ प्रमाणे येत्या १५ दिवसात किंमत द्यावे, नुकसान भरपाई द्यावे, अन्यथा आम्ही मेट्रोसेंटर पनवेल येथे आमरण उपोषणास बसणार आहोत, याची नोंद घ्यावी.
>
> - सुधाकर नाईक, प्रकल्पग्रस्त,विरार कॉरीडोर प्रकल्प

# महेश शिंदे यांना शिवीगाळ

### पत्रकारांकडून निषेध; कारवाईची मागणी



**। महाड । वार्ताहर ।**

महाड शहरातील पत्रकार महेश शिंदे यांना क्षुल्लक कारणावरून महाडमधील एका राजकीय पक्षाचा कार्यकर्ता आणि माजी नगरसेवक दीपक सावंत आणि त्याचा मुलगा सुरज सावंत यांनी शिवीगाळ आणि जिवे ठार मारण्याची धमकी दिली. याबाबत महाड शहर पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल केली असून दीपक सावंत आणि त्यांचा मुलगा सुरज सावंत यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी महाडमधील सर्व पत्रकारांनी केली आहे.

महेश शिंदे आणि सोबतचे पत्रकार राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यालयात अधिकाऱ्यांना भेटण्यासाठी गेले होते. मात्र, याठिकाणी अधिकारी उपलब्ध नव्हते. त्यामुळे त्याठिकाणी उपस्थित असलेले पाटील नामक कर्मचाऱ्याजवळ साधक बाधक चर्चा सुरू होती. त्यादरम्यान लाडवली गावामध्ये मद्य विक्री परवाना करता दोन अर्ज आले आहेत. याबाबत काय झाले असे महेश शिंदे यांनी विचारले. संबंधित कर्मचाऱ्याने आपल्याला ही माहिती उपलब्ध नाही असे सांगितल्याने महेश शिंदे आणि अन्य पत्रकार तिथून निघून आले.

मात्र, संबंधित कार्यालयातील कर्मचारी पाटील यांनी दीपक सावंत यांना महेश शिंदे यांच्या बाबतीत गैरसमज निर्माण करून देत महेश शिंदे सातत्याने तुमच्या परवानाबाबत विचारणा करत आहेत, असे सांगितले. यामुळे दीपक सावंत यांनी महेश शिंदे यांना दि. २९ मार्च रोजी दूरध्वनीद्वारे शिवीगाळ आणि धमकी दिली. त्याचप्रमाणे दीपक सावंत यांचा मुलगा देखील महेश शिंदे यांच्या घरी गेला आणि उद्धटपणे दादागिरीची भाषा केली. यामुळे महेश शिंदे यांचे कुटुंब पूर्णपणे घाबरले. याबाबत महेश शिंदे यांनी महाड पत्रकार संघ तसेच अन्य पत्रकारांशी चर्चा केल्यानंतर याबाबत पोलीस तक्रार दाखल करावी, असा निर्णय घेण्यात आला.

यावेळी महाड पत्रकार संघाचे अध्यक्ष निलेश पवार, महाड प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रवीण कुलकर्णी, रायगड जिल्हा प्रेस क्लबचे अध्यक्ष मनोज खांबे यांसह जवळपास वीसहून अधिक पत्रकार उपस्थित होते.

## सचिन घाडी पुरस्काराने सन्मानित

**। सोगाव । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील सर्वसामान्य जनमानसात आपल्या सामाजिक कार्याबद्दल प्रसिद्ध असणारे मूनवली मापगाव येथील सचिन हरिश्चंद्र घाडी यांना दि.२८ मार्च रोजी त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल मुंबई येथील कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते राज्यस्तरीय 'छत्रपती शिवाजी महाराज पुरस्कार २०२४'ने सन्मानित करण्यात आले.



या पुरस्कार सोहळ्यात महाराष्ट्रातील प्रमुख मान्यवरांच्या हस्ते महाराष्ट्रातील जनसेवा करणाऱ्या वैद्यकीय, शिक्षण, समाजसेवा, कला व कृषी क्षेत्रातील गुणिजनांचा सत्कार करण्यात आला. पुरस्कार सोहळ्याला सतिश घाडी व मित्रपरिवार उपस्थित होते. सतिश घाडी यांनी सचिन घाडी यांना सामाजिक कार्यात राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



● मुरुड परिसरात एप्रिल महिना सुरु झाला की पाण्यासाठी सिमेंट रिंग विहिरी बनवण्याचे काम सुरु होते. मुरुड शहरात या कामाचे कामगार प्रसिद्ध असल्याने ते स्वत: सिमेंट रिंग बनवतात. सध्या हा व्यवसाय तेजीत आहे. पाणी टंचाईवर मात करण्यासाठी या विहिरीचा मोठा हातभार लागतो. (छायाचित्र- सुधीर नाझरे)

## माजी विद्यार्थिनींचा स्नेहमेळावा

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगावात शासकीय अध्यापिका विद्यालयातील माजी विद्यार्थिनींचा स्नेह मेळावा साजरा झाला. तब्बल २९ वर्षानंतर भेट झाल्याने मैत्रिणींचा आनंद गगनात मावेनासा झाला. या मेळाव्यात मैत्रिणींनी एकमेकींच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला.

शासकिय अध्यापिका विद्यालय माणगावच्या सन १९९४-९५ च्या वर्गातील मैत्रिणींचा स्नेहमेळावा तब्बल २९ वर्षानंतर मोठ्या उत्साहात माणगावात संपन्न झाला. दोन दिवसांचा हा कार्यक्रम अतिशय उत्साही व आनंददायी वातावरणात साजरा केला. दोन दिवसांचा कार्यक्रम होळीचे रंग उधळत गोळा करत मेळावा संपन्न झाला.



## चौथीच्या विद्यार्थ्यांचा निरोप सभारंभ



**। म्हसळा । वार्ताहर ।**

दहावी, बारावीनंतर किंवा महाविद्यालय संपतानाचा निरोप समारंभसगळ्यांनीअनुभवलाअसलेच पण म्हसळा शहरातील रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील इयत्ता चौथीच्या विद्यार्थांनी निरोप समारंभाची मजा लुटली.

या कार्यक्रमाला शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शशिकांत शिर्के, उपाध्यक्ष समिधा वेदक, सदस्य सोनाली लहारे, वैशाली करंबे, मनस्वी जाधव, मुख्याध्यापिका सुमित्रा खेडेकर, अरुण माळी, इंदिरा चौधरी, जयश्री गायकवाड, तिलोसमा गायकवाड, श्रीधर उमदी आदि मान्यवर उपस्थित होते.

यावेळी सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा दिला. इयत्ता पहिली पासून या शाळेच्या प्रत्येक शिक्षकाने आपल्याला छान छान गोष्टी सांगून तसेच विविध धडे देऊन आपल्याला कसे घडवले, आपण शाळेत कोणत्या गंमती केल्या, सर्व शिक्षकांनी आपली कशी काळजी घेतली, याबाबत आपल्या अनेक आठवणी सांगीतल्या. या कार्यक्रम प्रसंगी शिक्षकांच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला.

## संस्थेचा वर्धापन दिन

**। चौक । प्रतिनिधी ।**

ज्येष्ठ नागरिक संस्था चौकचा २१ वा वर्धापन दिन दि.३१ मार्च रोजी वसंत कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेच्या सभागृहात संपन्न झाला. गणेश पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यानंतर वर्षभरात ज्येष्ठांसाठी आयोजित केलेले आरोग्य शिबिर, एकदिवसीय सहल, सत्कार, वाढदिवस, मासिक मीटिंग यांचा अहवाल वाचन करण्यात येऊन ज्येष्ठ पुरुष व महिला सदस्य, पत्रकार, सुभाष पवार यांचा सत्कार करण्यात आला. या वर्धापन दिनासाठी सुमारे दोनशेहून अधिक सदस्य महिला व पुरुष उपस्थित होते.

## थिटे यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील बाहे गावातील शेतकरी कै. बाळू गंगाराम थिटे यांच्या ७५ व्या जयंतीनिमित्त सोमवारी (दि.१) विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल होते.



तालुका कुणबी समाज युवक अध्यक्ष अनंत थिटे यांचे वडील असणारे कै. बाळू गंगाराम थिटे यांच्या स्मृतींना उजाळा मिळावा या उद्देशाने थिटे परिवाराच्यावतीने या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सर्वप्रथम कै. बाळू गंगाराम थिटे यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना सुरेश मगर, अनंत ढमाळ, यशवंत हळदे, शशिकांत कडू, अरविंद मगर, अरूण आगळे, डॉ.अनिल गीते, सुरेश थिटे, सहदेव ठमके, दीपिका पिंपळे, रूपाली खरात आदी मान्यवरांकडून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमातंर्गत थिटे परिवाराच्यावतीने शाळेला कपाट भेट देऊन विद्यार्थी वर्गाला ओळखपत्र देण्यात आले. तसेच, त्यांची रक्तगट तपासणी करून खाऊचे वाटप करण्यात आले.

## उत्कृष्ट अंगणवाडी पुरस्कार सोहळा

**। सोगाव । वार्ताहर ।**

दी लाईफ फाऊंडेशन तसेच एकात्मिक बाल विकास प्रकल्प अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून अलिबाग येथे शनिवार दि.३० मार्च रोजी उत्कृष्ट अंगणवाडी पुरस्कार सोहळा साजरा करण्यात आला.

यावेळी राजिप मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, निर्मला कूचिक, गीतांजली पाटील, विजय मयेकर, रेखा सहानी, शालिनी मखीजा, विनोद लाला, अजित लालवानी, महेश माखीजा, उल्का कुलकर्णी, विनोदिनी मोकल, भाग्यश्री पाटील, सामिया पेरेकर, दीप्ती मोकल, कल्पिता साळावकर, शिलानंद इंगळे, पल्लवी राणे, प्रणय ओव्हाळ, राखी राणे, प्रियांका शिंदे, मुस्कान शेख, योजना शितोळे, प्रदीप दबळे, स्वप्नाली, प्रदीप पाटील, अंगणवाडी सेविका व मदतनीस मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

शिलानंद इंगळे यांनी फाऊंडेशनच्या माध्यमातून समाजातील तळागाळातील लोकांसाठी सामाजिक हिताची जाणीव ठेवून राबविण्यात येणाऱ्या सामाजिक उपक्रमांबद्दल माहिती दिली व या कार्यक्रमाचा हेतू हा अंगणवाडीतील मुलांचे आरोग्य सुधारण्यासाठी व शैक्षणिक साहित्य आणण्यासाठी खारीचा वाटा उचलून मदत करणे हा असल्याचे सांगितले.



## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

● चेंढरे अलिबाग येथे बंगला with Terrace भाड्याने देणे आहे. बंगला १००० चौरस फूट. मागे २००० चौरस फूट लॉन, नारळाची झाडे. इच्छुक भाडेकरूंनी संपर्क साधावा ९८६७२१४६१६

● मांडवा जेट्टी येथील घर व घराच्या आजूबाजूचा परिसर साफ सफाई करण्यासाठी पुरुष/मुलगा पाहिजे.मासिक पगार रुपये ८०००/- ते १००००/- वयाची अट नाही. संपर्क : ८६९८६८२१२१

● अकाऊंटंट पाहिजे- जीएसटी बील व रिर्टनस्चा कमीत कमी २ वर्षे अनुभव असावा. प्रत्यक्ष भेटा. संपर्क ९६२३१११४६०. एम.जे. एन्टरप्रायजेस, ब्राह्मण आळी, अलिबाग.

● विक्री आणि marketing व्यक्ती आवश्यक आहे । किमान पदवी पूर्ण केलेला । ०-२ वर्षे अनुभव । प्रतिस्पर्धी पगार । marketing कौशल्ये असली पाहिजेत Accountant आवश्यक आहे । टॅली अनिवार्य । ०-२ वर्षे अनुभव । सर्व दुकान खाते घेणे पाहिजे । दुकानमधून काम । प्रतिस्पर्धी पगार रसिक हार्डवेअर । फोन नंबर: +९१ ९४२२६९०८५४

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# आदर्श पतसंस्थेची नावाप्रमाणे कामगिरी

### एक टक्क्यापेक्षा कमी नाममात्र एनपीए

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेच्या सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात ढोबळ एनपीएमध्ये ०.३७ टक्क्यांनी घट झाली आहे. ढोबळ एनपीए ०.५६ टक्के इतका आहे. हे एनपीए प्रमाण नाममात्र आहे. निव्वळ नफा ६ कोटी १० लाख रूपये झाला आहे. आदर्शच्या एकत्रीत व्यवसायात ११० कोटी ५० लाख रूपयांनी वाढ झाली आहे. आर्थिक सक्षम, ढोबळ एन.पी.ए नाममात्र, उत्तम लाभता क्षमता असलेली आदर्श पतसंस्था आपल्या नावाप्रमाणे आदर्श काम करत आहे, अशी माहिती आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक सुरेश पाटील व अध्यक्ष अभिजित पाटील यांनी दिली.



सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात आदर्श नागरी पतसंस्थेचा ढोबळ एनपीए ०.९२ टक्के होता. त्यात सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात ०.३७ टक्क्यांनी घट झाली आहे. यंदा एनपीए प्रमाण ०.५६ टक्के आहे. तसेच, निव्वळ एनपीए प्रमाण शून्य टक्के आहे. आदर्श पतसंस्थेने सलग १६ वर्षे निव्वळ एनपीए प्रमाण शून्य टक्के राखले आहे, अशी माहिती सुरेश पाटील यांनी दिली. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात संस्थेला ढोबळ नफा ८ कोटी ५ लाख रुपये झाला आहे. मागील वर्षाच्या तुलनेत निव्वळ नफ्यात १ कोटी २९ लाख रूपये वाढ झाली आहे. संस्थेने १३३ कोटी ६६ लाख रुपयांची गुंतवणूक केली आहे.

आदर्श पतसंस्थेने ६१८ कोटी ५७ लाख रुपयांचा एकत्रित व्यवसाय केला आहे. मागील वर्षी ५०८ कोटी ८ लाख रूपयांचा एकत्रीत व्यवसाय होता. आदर्शचे वसूल भागभांडवल १६ कोटी ७४ लाख रूपये आहे. आदर्श नागरी पतसंस्थेच्या ठेवी ३५८ कोटी ५ लाख रूपये आहेत. गेल्या वर्षी संस्थेच्या ३०२ कोटी ९२ लाख रूपये ठेवी होत्या. त्यात यावर्षी ५५ कोटी १४ लाख रूपयांनी वाढ झाली आहे. सन २०२२-२३ मध्ये संस्थेचे २०५ कोटी १६ लाख रूपये कर्ज वाटप होते. सन २०२३-२४ मध्ये संस्थेचे २६० कोटी ५२ लाख रूपये कर्ज वाटप झाले आहे. मुदतपूर्ण थकबाकी ७ कर्जदारांकडे आहे. त्याचे प्रमाण ०.०१ टक्के असल्याचे अभिजीत पाटील यांनी सांगितले.

# मतदार जनजागृतीसाठी गीतमाला सिडीचे प्रकाशन

**। खास प्रतिनिधी । रायगड ।**

जिल्ह्यात लोकसभा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी जिल्हानिवडणूक अधिकारी किशन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासन प्रयत्नशील आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून मतदार जनजागृतीसाठी गीतमाला तयार करण्यात आली आहे. या गीतांच्या सिडीचे प्रकाशन जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याहस्ते करण्यात आले.

मतदार जनजागृतीसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या उत्सवात प्रत्येक मतदाराने मतदान करुन आपला सहभाग नोंदवावा यासाठी या गीतांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येणार आहे. श्रीवर्धन विधानसभा मतदार संघाचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी महेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार समीर घारे यांनी या गीतांची निर्मिती केली आहे.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील क्षेत्राचे वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक **१) श्री. रामचंद्र शंकर सुखटणकर** यांचे मालकी हक्क तपासणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे - सोगांव, ता. अलिबाग, जि. रायगड**

| क्र. | भूमापन क्र व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| १ | १८३/१८४ | जिरायत १.०५.३०<br>पो.ख. ०.००.७०<br>एकूण १.०६.०० | २८.१०/- |
| २ | १७९/१८०/१८१ | जिरायत १.७२.००<br>पो.ख. ०.००.००<br>एकूण १.७२.०० | ४३.८२ |

**वरील क्र. २ मिळकत पैकी श्री. रामचंद्र शंकर सुखटणकर यांचे नावे असणारे क्षेत्र ००.९२.०० हे आर आकार २२.४४/- रु. पै या नोटीसीचा विषय आहे.**


वर वर्णन केल्याप्रमाणे क्षेत्राची जमिन मिळकती ह्या त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहिवाटीतील असून, त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्या बाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा तिचे कोणत्याही भागावार कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचाकरार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरीहक्क या अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत आल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रार नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखीस्वरूपात आणून द्यावीत, मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकती विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काच्या आहेत व त्यावर अन्य कुणाचा ही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०३/०४/२०२४

**ॲड. राहुल रमेश नाईक**
मु. नागांव, ता. अलिबाग
मोबा. क्र. ९९२२७९ ८५२८


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, खाली नमूद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मौजे - घोटवडे, ता. सुधागड, जि. रायगड येथील जमीन मिळकत.**

**मिळकतीचे वर्णन :-**

| जमिन मालकाची नांवे | गट/स.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| १. श्री.योगेश हनुमंत मोरे<br>२. विवेक सुर्याजी पाटील | १६३/४ | ०-१४-०० | ०-०६ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून त्यासंबधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हीतसंबध नाही व असल्यास त्यानी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे. येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- ०३/०४/२०२४

सही/-
खरेदीदारांचे लेखक,
**श्री. सरदारमल जोरावरमल राठोड स्टॅम्प व्हेंडर,**
६९९ जमना निवास, पाली ता. सुधागड, जि. रायगड.
मो. ९४२११६८७६३/९२७०३६७२९०

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की मौजे दहिवली तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विदयमान मालक रिया अतीन साहा यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे दहिवली तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ३९ | २ | ०-९५-०० | ०-४७ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपटटा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०३/०४/२०२४

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड
४१०२०१ मो.९४२२०६८७५५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने कळविणेत येते की, खाली नमुद केलेली शेतजमिन मिळकत ही या खाली दिलेल्या जमिन मालक यांचे नावावर ७/१२ उतारा सदरी महसुल दप्तरी नांवे असून त्या त्यांचे खुद्द ताबा कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे त्या शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मौजे केळघर, ता. रोहा, जि. रायगड येथील मिळकत**

| मालकाचे नांव | गट नं. | एकूण क्षेत्र हे. आर | आकार रु. पै. | प्रकार |
|---|---|---|---|---|
| निराबाई विठोबा कांबळे व इतर ४ | ६३ | जिरायत ०-६१-६०<br>पो.ख ००-०१-९०<br>एकूण ०-६३-५० | ११.३२ | नि.स.प्र |

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशिल यांनी जमिन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहाण, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिन चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कब्जा, वहिवाट वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, वाद, तंटा चालू असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून (१५) पंधरा दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आवश्यक कागदपत्रे सादर करुन खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

दि. ०३/०४/२०२४

सही/-
**ॲड. पी. जी. दाभाडे**
रा. फ्लॅट नं. ४०२, बी. विंग, चौथा मजला,
साईनगरी सोसायटी, छत्रपती शिवाजी नगर,
डॉ. वागळे डॉस्पिटल जवळ, ता. रोहा, जि. रायगड
पिन नं.४०२१०९ मोबा नं. ९२७२७१३९५६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या नोटीसने सूचित करण्यात येते कि, आमचे अशील हे खालील वर्णनाच्या मिळकतीचे विद्यमान मालका कडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणे आमचे अशील व मिळकतीचे मालक यांच्या मध्ये सुरु आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**पत्ता मौजे-शेणवली ता.ताळा, जि.रायगड**

| क्र. | गट न. | एकूण क्षेत्र | मालकाचे नाव | प्रकार |
|---|---|---|---|---|
| १. | १२५/१ | १.४४.०० | नथुराम कृष्णा वाजे | खरीप |

तिचे कोणतेही भागावर, विक्री, गहन, दान, भाडेपट्टा, वारसा हक्क, विक्रीचा करार, लीज, चार्ज, पोटगी, वहिवाट, इजामेन्तरी या अथवा कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध असल्यास अथवा कोणत्याही स्वरुपात सदर मिळकतीची विक्री व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी हरकत अथवा तक्रार हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ५ पाच दिवसाच्या आत सही करणार यांचेकडे लेखी स्वरुपात कागदपत्र सहित सादर करावे.

मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्भेद आहे असे समजून आमचे अशील व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कोणाचीही हरकत तक्रार असल्यास ती विचारात घेतली जाणार नाही.

माणगाव
दि. ०१/०४/२०२४

सही/-
**ॲड. जयदिप दिपक महाडीक**
ऑफीस पत्ता- तळाशेत
(इंदापूर लक्ष्मी निवास,
ता. माणगांव, जि. रायगड
मो. नं. ७२१९५४६०९७

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे बहिरोळे, ता. अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीच्या विद्यमान मालक प्रकाश वासुदेव चांदोरकर, केशव वासुदेव चांदोरकर, विनायक वासुदेव चांदोरकर, यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| बहिरोळे ता. अलिबाग, | १८५ | जिरायत ०-०२-०० | ०.११ |

वर वर्णन जमिन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदरहू वर्णन केलेली मिळकत निर्वेध, बोजा रहीत असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम.ओ.यू. करार, ताबेकब्जा वहीवाट, रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गुहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. ०२/०४/२०२४
मोबा. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
मु. बुरूमखाण, पो. बरसोली
ता. अलिबाग, जि. रायगड

# राज्यात २४.४० टक्के कुटुंब दारिद्र्यरेषेखाली

## नीती आयोगाच्या अहवालावर प्रश्नचिन्ह

**। नागपूर । वृत्तसंस्था ।**

नीती आयोगाच्या अहवालानुसार, देशातील बहुआयामी गरिबी २०१३-१४ मध्ये एकूण लोकसंख्येच्या २९.१७ टक्के होती. २०२२-२३ मध्ये हे प्रमाण ११.२८ टक्क्यांवर घसरले. महाराष्ट्रात २०१४ च्या तुलनेत २०२२ मध्ये दारिद्र्यरेषेखालील शिधापत्रिकांची संख्या ५.१५ टक्के घटली. परंतु, आजही २४.४० टक्के शिक्षापत्रिका दारिद्र्यरेषेखालील असल्याने नीती आयोगाच्या अहवालावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

नीती आयोगाच्या अहवालानुसार, भारतातील गरिबीचा दर २०१३-१४ मधील २९.१७ टक्क्यांवरून २०२२- २३ मध्ये ११.२८ टक्क्यांवर खाली आला. त्यानुसार गेल्या ९ वर्षांत गरिबीत १७.८९ टक्के घट झाली. त्यातच राज्यातील अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या आकडेवारीनुसार राज्यात ३१ डिसेंबर २०१४ मध्ये दारिद्र्यरेषेखालील ४५ लाख ३४ हजार ८३६ तर त्याहून गरीब अंत्योदय अन्न योजनाचे २४ लाख ७२ हजार ७५३ शिधापत्रक होते. तर केशरी दारिद्र्यरेषेवरील एक कोटी ४६ लाख ४५ हजार २३, अन्नपूर्णाचे ६४ हजार ८६६, पांढरेचे १९ लाख ९३ हजार १८८ असे एकूण २ कोटी ३७ लाख १० हजार ६६६ शिधापत्रक होते.

राज्यातील एकूण शिधापत्रिकेची संख्या २०१४ च्या तुलनेत ३१ डिसेंबर २०२२ रोजी वाढून २ कोटी ५६ लाख ५५ हजार ३१४ झाली. त्यात दारिद्र्यरेषेखालील ३७ लाख ६१७, अंत्योदय अन्न योजनाचे २५ लाख ६० हजार ३३५, केशरी प्राधान्य कुटुंबाचे ९० लाख ३५ हजार ५२३, केशरी प्राधान्य कुटुंब शेतकरीचे ८ लाख ८७ हजार ४८१, बिगर प्राधान्य कुटुंबचे ७२ लाख ४४ हजार ३४९, अन्नपूर्णाचे ६३४७, पांढरेचे २२ लाख २० हजार ५६४ शिधापत्रकधारक आहेत.

त्यामुळे २०१४ मध्ये राज्यात दारिद्र्यरेषेखालील (अंत्योदयसह) एकूण ७० लाख ७ हजार ५८९ शिधापत्रक असल्याचे माहितीच्या अधिकारातून सामाजिक कार्यकर्ते संजय अग्रवाल यांनी पुढे आनले. ही दारिद्र्यरेषेखालील (अंत्योदयसह) शिधापत्रिकांची संख्या २०२२ मध्ये ६२ लाख ६१ हजार ५० होती. त्यामुळे २०१४ च्या तुलनेत २०२२ मध्ये दारिद्र्यरेषेखालील शिधापत्रकांमध्ये ५ टक्के घट झाली. परंतु नीती आयोगाच्या अहवालाच्या तुलनेत ही घट खूपच कमी असल्याने त्यांच्या अहवालावर संजय अग्रवाल यांनी प्रश्न उपस्थित केले आहे.

## सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प अपघाताला निमंत्रण

**। नेरळ । वार्ताहर ।**

माथेरान शहरातील सांडपाण्याचे व्यवस्थापन करण्यासाठी मलनि:सारण प्रकल्प उभारला जात आहे. या प्रकल्पाच्या कामाबद्दल शंका उपस्थित होत आहेत. सध्या हॉटेल लाईनवर चेंबर बनविण्याची कामे सुरु असून नव्याने बनविलेल्या चेंबरला भोके पडली आहेत. त्यामुळे घोडे कोसळून अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याबद्दल माथेरानमधील अश्वपाल यांनी अपघाताची भीती व्यक्त केली.

माथेरानमधील सांडपाणी शहरातून दरीमध्ये जाऊ नये. यासाठी राज्य मानवी हक्क आयोगाच्या आदेशाने शासनाने सांडपाणी प्रकल्प मंजूर केला आहे.त्या प्रकल्पाच्या कामाबद्दल माथेरानमधील नागरिक नाराज आहेत. स्थानिकांची नाराजी लक्षात घेऊन माथेरान नगरपरिषदेकडून सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पाचे काम काही दिवस थांबवून ठेवण्यात आले होते. मात्र आता पुन्हा या प्रकल्पाचे काम सुरु झाल्यानंतर देखील ठेकेदार कंपनीकडून पुन्हा एकदा स्थानिकांची नाराजी ओढवून घेत आहे. त्यात सध्या माथेरान शहरातील हॉटेल लाईन भागात कामे सुरु केले आहे. त्या भागातील प्रेमदिप हॉटेल समोरील रस्त्यावर बसविण्यात आलेल्या सिमेंट चेंबर थेट फुटली आहेत. त्या भागातून माल वाहतूक करणारे घोडे तसेच पर्यटक यांची ये-जा सुरु असते. माथेरान शहरात हॉटेल्समध्ये पाहुणे म्हणून आलेले पर्यटक हे याच रस्त्याने मुख्य बाजारपेठ भागात जातात. त्यात या भागातील रस्त्यावर पूर्णपणे विजेचे दिवेदेखील नाहीत. त्यामुळे पर्यटकांचा चेंबरवर पडून अपघात होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याबाबत पर्यटकांची वाहतूक करणारे अश्वपालक यांनी नाराजी व्यक्त केली असून पालिकेने तात्काळ चेंबर दुरुस्ती करून घेण्यात यावी, अशी मागणी केली आहे.

त्या चेंबरबद्दल माथेरानमधील अश्वपालक यांच्याकडून माथेरान नगरपरिषद, पालिका मुख्याधिकारी तसेच पालिका अभियंता यांना कळविले आहे. त्याबाबत पालिका अभियंता अभिमन्यू येळवंडे यांच्याकडून माहिती घेतली असता, मी कर्जत नगरपरिषदमध्ये असून त्या चेंबरबद्दल माहिती घेत असून उद्या माथेरान येथे गेल्यावर तात्काळ पाहणी करून ठेकेदाराला निर्देश देण्यात येतील.

## ५ मे रोजी राष्ट्रीय लोक अदालत

**रायगड :** जिल्ह्यामध्ये ५ मे २०२४ रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती न्यायाधीश तथा सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड अलिबाग अमोल शिंदे यांनी दिली. या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये रायगड जिल्ह्यातील सर्व न्यायालयात प्रलंबित असलेली, दिवाणी व तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, दिवाणी व तडजोडपात्र फौजदारी अपिले, मोटार अपघात प्रकरणे, विवाह विषयक प्रलंबित प्रकरणे, तसेच ग्रामपंचायत यांच्याकडील घरपट्टी, पाणीपट्टी बिलाच्या देयकाबाबतची वादपूर्व प्रकरणे, भारत दूर संचार निगम लिमिटेड, वीजवितरण, राष्ट्रीयकृत बँका आणि पतसंस्था व इतर वित्तीय संस्था यांच्याकडील थकबाकीबाबतची वादपूर्व प्रकरणे या लोक अदालतीमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात येतात. ०५ मे रोजी होणाऱ्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी सहकार्य करावे आणि या लोक अदालतीचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन रायगड जिल्हा व सत्र न्यायाधिश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष ए.एस. राजंदेकर यांनी केले आहे.

## राज्यातील नऊ वस्तूंना जीआय मानांकन

**रायगड :** एकावेळी राज्यातील नऊ वस्तूंना भौगोलिक सूचकांक (जीआय) मानांकन प्राप्त झाले. यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता आणि संवर्धनाला मोठा उपयोग होणार आहे. जीआय मानांकन विषयातील तज्ज्ञ गणेश हिंगमिरे यांच्या प्रयत्नातून शक्य झाले आहे. विशेष म्हणजे आसाममधील बोडोलँडच्या १३ वस्तूंनाही हिंगमिरे यांच्या प्रयत्नातून जीआय मानांकन मिळाले आहे.राज्यातील जवळपास प्रत्येक जिल्ह्यातील एका उत्पादनाला किंवा वस्तूला जीआय मानांकन प्राप्त व्हावेत म्हणून हिंगमिरे यांनी प्रयत्न केले आहेत. ते म्हणाले, राज्यातील ३८ उत्पादनांना जीआय मानांकन प्राप्त करण्याचे भाग्य मला लाभले. खरेतर ही चळवळ पुण्यातूनच सुरू झाली. २००७ मध्ये पुणेरी पगडीला मानांकन प्राप्त झाले होते. आता स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त ७५ वस्तूंना जीआय मानांकन मिळविण्यासाठी प्रयत्न झाले. त्यातीलच या नऊ गोष्टींचा समावेश आहे.एखाद्या वस्तूचा इतिहास, भूगोल आणि शास्त्र बघितल्यानंतरच जीआय मानांकन प्राप्त होते. अशा मानांकनामुळे संबंधित वस्तू किंवा उत्पादनाचे संवर्धन तर होते; शिवाय त्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळखही प्राप्त होते. यामुळे त्याची निर्यात करणे शक्य होत असल्याचेही हिंगमिरे यांनी सांगितले. ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणारे हे मानांकन असल्याचे हिंगमिरे म्हणाले.

## जाहीर नोटीस

दिनांक : ०२/०४/२०२४

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. जितेंद्र रमेश नाईक रा. मु. म्हात्रोळी, पो. सारळ, ता. अलिबाग, जि. रायगड यांचे मार्फत कळविण्यात येते की, मौजे म्हात्रोळी पो. सारळ, ता. अलिबाग, जि. रायगड येथे खालील वर्णनाची मिळकत आमच्या अशिलांच्या ताबे कब्जा वहिवाटीच्या आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| म्हात्रोळी, ता. अलिबाग | २१७/१ | ०-२७-००<br>पो.ख. ०-०५-२०<br>एकूण ०-३२-२० | १.७५ |
| म्हात्रोळी, ता. अलिबाग | २१७/२ | ०-४१-४०<br>पो.ख. ०-००-००<br>एकूण ०-४१-४० | २.०२ |

वरील वर्णनाची मिळकत या वर्षानुवर्षे आमच्या अशिलांच्या ताबे कब्जा वहिवाटीत आहे. सदर मिळकती संदर्भात आमच्या अशिलांनी श्री. आशिष अंकुश वार्डे व निरज माहेन पटेल व इतर २१ यांचेविरूध्द अलिबाग येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात रेग्युलर दिवाणी मुकदमा नं. ३६/२०२४ हा दावा दाखल केलेला आहे.

आमचे अशिलांनी सदर मिळकतीबाबत लिस्ट पेंडेंन्स देखील रजिस्टर कार्यालय अलिबाग येथे केलेले आहे.

वरील मिळकती संदर्भात श्री. आशिष अंकुश वार्डे व निरज माहेन पटेल व इतर २१ अन्य त्रयस्थ इसमांचे हक्क हितसंबंध निर्माण करण्याच्या विचारात असल्याचे तसेच विक्री करण्याचे विचारात असल्याचे आमचे अशिलांना समजलेले आहे. आमचे अशिलांची त्यास सक्त हरकत आहे. आमचे अशिलांचे ताबे कब्जा वहिवाटीत आहे तसेच त्या संदर्भातील योग्य ती दाद त्यांनी न्यायालयात मागितलेली आहे.

तरी या नोटीसीने सर्वाना कळविण्यात येते की, वरील वर्णनाच्या मिळकती संदर्भात कोणीही कसल्याही प्रकारचा व्य श्री. आशिष अंकुश वार्डे व निरज माहेन पटेल व इतर २१ सह हिस्सेदार यांच्यासोबत करू नये केल्यास तो बेकायदेशीर होईल सदर मिळकतीबाबत अन्य कोणत्याही त्रयस्थ इसमांनी आमचे अशिलांचे हक्कावर बाधा येईल असे कृत्य करू नये. तसेच सह हिस्सेदार यांचेसोबत कोणताही व्यवहार करू नये त्यास आमची सक्त हरकत राहील. सदरील कोणताही बेकायदेशीर व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : ०२/०४/२०२४

सही/-
**ॲड. रूखसार अ. मुजावर**
जिल्हा न्यायालय अलिबाग-रायगड
मो.नं. ७०३०६२७५८७/९०११८१७९०४

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी दिलेल्या सुचनेवरून आम्ही मौजे सोगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मेनका राजन जाम यांच्या नावे असलेल्या खालील परिशिष्टात नमूद केलेल्या बिनशेती मिळकतींच्या मालकी हक्कांच्या निर्वेधतेची पडताळणी करीत आहोत. परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतींचे मालकांनी असे निवेदीत केले आहे की, खाली नमूद परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतींमध्ये त्यांस पुर्णपणे व निर्वेध मालकीहक्क आहेत व त्या विकणेचा त्यांस पुर्ण हक्क अधिकार आहे.

तरी ज्या इसमांचा त्या मिळकतींमध्ये अथवा त्यांतील कोणत्याही भागावर अथवा भागामध्ये करार, संमतीज्ञापन, भागीदारी, खरेदी, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, वारसा, बोजा, दान, गहाण, हस्तांतरण, अदलाबदल, विश्वस्त, ताबा, परवाना, वहिवाट, कसवणुक, पोटगी, मृत्यूपत्र, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, कोर्टाचा हुकुमनामा, वहिवाटीच्या रस्त्याचा करार या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असेल, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित रजिस्टर्ड पोस्ट अे.डी. द्वारे लेखी कळवावे. मुदतीत तसे कुणीही न कळविल्यास, सदर मिळकतींमध्ये कुणाचाही कोणताही हक्कहितसंबंध नाही अथवा असल्यास तो कायम स्वरूपी सोडून देण्यात आला आहे, असे समजण्यात येईल व मिळकतींचे विद्यमान मालकांचे मालकी हक्क निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहेत असे गृहित धरून आमचे अशिल विक्री व्यवहार पुर्ण करतील. नोटीस मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार, हरकत अथवा दावा विचारात घेतला जाणार नाही.

**परिशिष्ट**
**मौजे सोगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| गट क्रमांक | क्षेत्र आर.चौ. मी. | आकार रू.पैसे |
|---|---|---|
| २६० | ४२-५०-०० | ४२५.०० |
| २६२ | ४६-९०-०० | ४६९.०० |
| २६३ | ४६-५०-०० | ४६५.०० |

अलिबाग
तारीख : ३/४/२०२४

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## जाहीर नोटीस

अर्ज क. ७०/२०२४

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी साो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. सचिन यशवंत करकरे
वय ३८ वर्षे, धंदा : शेती, — अर्जदार
रा. मु. नवघर, पो. लोणेरे, ता. माणगांव, जि. रायगड.

विरुध्द

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह, नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत लोणेरे, ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी साो.,
पंचायत समिती माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदर अर्जदार श्री. सचिन यशवंत करकरे यांचे चुलते के. संतोष दगडू करकरे हे दि.०१/०३/२०१२ रोजी मौजे लोणेरे वाडी नवघर, ता. माणगांव, जि. रायगड. येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले. त्यांचे मुत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. १३/०३/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे चुलते कै. संतोष दगडू करकरे हे दि. ०१/०३/२०१२ रोजी मयत झाली असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. सचिन यशवंत करकरे यांचे चुलते कै. संतोष दगडू करकरे हे दि. ०१/०३/२०१२ रोजी मौजे लोणेरे वाडी नवघर, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगाव :
ता. : ०२/०४/२०२४

**सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. :-४०/ २०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी साो. माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. मोहमद हनिफ अब्दुल हामीद सोलकर
वयः ४८ वर्षे, धंदा शेती.
रा. मु. पो. साई, — अर्जदार
ता. माणगांव, जि. रायगड

विरुध्द

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत निजामपूर, ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो., पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

**तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,**

सदरहू अर्जदार श्री. मोहमद हनिफ अब्दुल हामीद सोलकर यांची पत्नी श्रीम. मरयम हसन जालगांवकर-लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. मरयम महमद हनिफ सोलकर - लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे निजामपूर, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ०५/०४/१९८१ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दाखला जावक क्र. १७६७/२०२४ ने दि. २८/०३/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे पत्नीचा जन्म मौजे निजामपूर, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ०५/०४/१९८१ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता २१ दिवसांचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. मोहमद हनिफ अब्दुल हामीद सोलकर यांची पत्नी श्रीम. मरयम हसन जालगांवकर - लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. मरयम महमद हनिफ सोलकर - लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे निजामपूर, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ०५/०४/१९८१ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव
ता. ०१/०४/२०२४

सही
**कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

**निवडक**

## हार्दिकवर बरसला इरफान

**मुंबई** : मुंबईची सुरुवात नेहमीच पराभवांनी होताना दिसते. सुरुवातीचे सामने जिंकण्यात संघाला नेहमीच अपयश येते. यावेळीही सारखीच परिस्थिती आहे, पण फरक एवढाच आहे की आता कर्णधारपद रोहित शर्माऐवजी हार्दिक पांड्याकडे आहे. अनेक क्रिकेटप्रेमींचे लक्ष आधीच वेधून घेतलेला हार्दिक पांड्या मुंबईला सलग तिसऱ्या सामन्यात विजय मिळवून देऊ शकला नाही. या पराभवानंतर भारताचा माजी खेळाडू इरफान पठाणने एक ट्विट केले आहे, ज्यात त्याने कोणाचे नाव न घेता निशाणा साधला.

## रोहितला चाहत्यांचा प्रतिसाद

**मुंबई** : मुंबईचा वानखेडेवर हा पहिलाच सामना होता. त्यामुळे चाहत्यांना आपल्या लाडक्या खेळाडूंना पाहायचे होते, त्यासाठी ते कमालीचे उत्सुक होते. हार्दिक पंड्याला चाहत्यांनी टॉस झाला तेव्हा चांगलेच ट्रोल केले होते. दुसरीकडे रोहित शर्माला मात्र चाहत्यांचा चांगला प्रतिसाद मिळत होता. रोहित शर्माला यावेळी चाहते चांगला पाठिंबा देत होते. सामना सुरु असताना एक चाहता मैदानात घुसून रोहित शर्माला चक्क भेटायला आला आणि त्यानंतर रोहित घाबरल्याचे पाहायला मिळाले.

## दुखापतग्रस्त धोनी

**नवी दिल्ली** : ४२ वर्षीय धोनी हा त्याच्या चाहत्यांसाठी वर्षभर सराव करून पुन्हा खेळण्यासाठी स्वतःला फिट केले आहे. पण गुडघ्याचे दुखणे आणि इतर त्रासांना त्याला या दरम्यान सामोरे जावे लागत आहे. धोनीने दिल्ली कॅपिटल्सविरूद्धच्या सामन्यात आपल्या जुन्या अंदाजात चौकार-षटकारांचा पाऊस पाडला. पण या सामन्यानंतरचा धोनीचा एक व्हीडिओ व्हायरल होत आहे. ज्यामध्ये धोनीच्या पायाला बर्फाची पट्टी घट्ट बांधली होती, कारण त्याला चालताना त्रास होत होता.

## खेळाडू सुपरमॅन अवतारात

**मुंबई** : मुंबई इंडियन्समध्ये एक वेगळीच आणि मजेशीर प्रथा आहे. मुंबई इंडियन्सच्या ताफ्यातील जे खेळाडू संघाच्या मिटींगला उशिरा येतात, त्यांना एक शिक्षा दिली जाते. या खेळाडूंना सर्वांसमोर प्रवासात शिक्षेचा भाग म्हणून जम्पसूट घालायचा असतो. यावेळेस मुंबईचे इशान किशन, नुवान तुषारा, कुमार कार्तिकेय आणि शम्स मुलानी या वेशात दिसले. हे सर्व खेळाडू या आगळ्यावेगळ्या सुपरमॅनच्या पोशाखासहित एअरपोर्टवर दिसले. ज्यांचे फोटो सोशल मिडियावर शेअर केले जात आहेत.

## राजस्थान अव्वलस्थानी

**मुंबई** : आयपीएल २०२४ मध्ये सोमवारी झालेल्या लढतीत राजस्थान रॉयल्सने मुंबई इंडियन्सवर ६ विकेट्सनी विजय मिळवला. राजस्थानचा हा सलग तिसरा विजय ठरला. तर, मुंबईचा सलग तिसरा पराभव होय. या विजयानंतर राजस्थानच्या संघाला एक मोठी आनंदाची बातमी मिळाली आहे. सलग ३ विजयानंतर संजू सॅम सनच्या नेतृत्वाखाली राजस्थानचा संघ ६ गुणा आणि प्लस १.२४९च्या नेटरनरेटसह गुणतक्त्यात अव्वल स्थानी पोहोचला आहे.

# मुंबई इंडियन्सचा लाजीरवाणा पराभव

## घरच्याच मैदानावर राजस्थानने लोळवलं



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबईतील वानखेडे मैदानावर सोमवारी (दि.१) राजस्थान रॉयल्स विरुद्ध मुंबई इंडियन्स सामना झाला. एकापेक्षा एक नावाजलेले फलंदाज अशी भरभक्कम तटबंदी असलेल्या मुंबई इंडियन्सच्या याच फलंदाजीचे बुरूज ढासळले आणि वानखेडे स्टेडियमवर राजस्थाविरुद्धच्या आयपीएल सामन्यात लाजीरवाण्या पराभवाचा सामना करावा लागला. सलग तिसऱ्या अपयशामुळे गुणफलकासमोरचा भोपळा कायम राहिला. या सामन्यात मुंबईच्या टॉप ऑर्डरची कामगिरी निराशाजनक होती. रोहित शर्मासह सुरुवातीचे तीन फलंदाज शून्यावर बाद झाले तेथून सुरू झालेली पडझड २० षटकांत नऊ बाद १२५ धावांपर्यंत कायम राहिली. या सामन्यात राजस्थान रॉयल्सने मुंबई इंडियन्सचा ६ गडी राखून दारूण पराभव केला आहे.

अगोदरच प्रेक्षकांचा विरोध सहन करणारा आणि संघाची फारच वाईट अवस्था अशा परिस्थितीत मैदानात येणाऱ्या हार्दिकने दडपण उडवत सहा चौकारांसह ३४ धावा केल्या. तिलक वर्मासह ३६ चेंडूत ५६ धावांची भागीदारी केली. संघाच्या फलंदाजीला पडलेले मोठे छिद्र बुजवण्याचा प्रयत्न केला; पण युझवेंद्र चहलच्या चेंडूवर उंच फटका मारण्याचा त्याचा प्रयत्न फसला. तिलक वर्मा चहलच्या गुगलीवर चकला, त्यावेळी मुंबई इंडियन्सने सातवा फलंदाज गमावला, तोपर्यंत तीन अंकी धावाही खात्यात जमा झाल्या नव्हत्या. अखेर १५व्या षटकांत शंभरी गाठण्यात आली. टीम डेव्हिड आणि जेरार्ड कोएत्झी ही फलंदाजांची शेवटची मैदानात होती; पण त्यांचाही बार फुसका ठरला.

१० संघांच्या आयपीएलमध्ये इतर नऊ संघांनी एक तरी विजय मिळवला आहे. अपवाद मात्र पाच वेळा अजिंक्यपदाचा लौकिक असलेल्या मुंबईचा आहे. तिन्ही सामने गमावल्यामुळे गुणांचे खाते उघडलेले नाही. हैदराबादविरुद्धच्या सामन्यात गोलंदाजांची बेदम पिटाई झाली होती. आज राजस्थानविरुद्ध फलंदाजांनी शरणागती स्वीकारली. एकूणच मुंबई इंडियन्स संघाची वाताहत कायम राहिली.

## किशोरी गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा

# महाराष्ट्राच्या मुली बाद फेरीत



**इतर निकाल संक्षिप्त**

१) 'ह' गट हिमाचल प्रदेश वि. मध्य प्रदेश (३४-२८)

२) 'अ' गट हरियाणा वि. भारतीय क्रीडा प्राधिकरण-साई (३१-१३)

३) 'क' गट उत्तर प्रदेश वि. आसाम (३६-१८),

४) 'फ' गट उत्तरांचल वि. कर्नाटक (४९-२८).

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्राने '३३व्या किशोरी गट राष्ट्रीय कबड्डी' स्पर्धेतील शेवटच्या साखळी लढतीत ओरिसाचा ५९-१९ असा पराभव करीत बाद फेरी गाठली. उपउपांत्यपूर्व फेरीत महाराष्ट्राची गाठ आता गत स्पर्धेत तृतीय क्रमांक प्राप्त केलेल्या उत्तर प्रदेश संघाशी पडेल.

पटना, बिहार येथील पाटली पुत्र क्रीडा संकुलात सुरू असलेल्या या स्पर्धेतील 'फ' गटातील शेवटच्या साखळी सामन्यात महाराष्ट्राने आक्रमक सुरुवात करीत चौथ्या मिनिटाला लोण देत १०-०० अशी आघाडी घेतली. सलग १५ गुण गमविल्यानंतर ओरिसाने मोनिका पवारची अव्वल पकड करीत आपले गुणांचे खाते उघडले. पण महाराष्ट्राने पुन्हा दुसरा लोण देत आपली आघाडी २१-०३ अशी वाढविली. मध्यांतराला महाराष्ट्राकडे ३०-१० अशी आघाडी होती.


उत्तरार्धात आणखी दोन लोण देत महाराष्ट्राने गुणांचे अर्धशतक पार केले. बिंदिसा सोनार, मोनिका पवार यांच्या झंझावाती चढाया त्याला उजवा कोपरा रक्षक साक्षी जाधवची मिळालेली पकडीची साथ यामुळे महाराष्ट्राने हा सामना मोठ्या फरकाने जिंकला.

# रोहित सांभाळणार पुन्हा मुंबईची धुरा?

## माजी खेळाडूचा मोठा दावा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

हार्दिक पांड्याच्या नेतृत्वात आयपीएल २०२४ मध्ये मुंबईला अद्याप सूर सापडेलला नाही. मुंबईला पहिल्या तिन्ही साम न्यात पराभवाचा सामना करावा लागला. मुंबईला घरच्या मैदानावर राजस्थानविरोधात पराभवाचा सामना करावा लागला. हार्दिक पांड्याच्या नेतृत्वात मुंबईला हवी तशी काम गिरी करता आलेली नाही. रोहित कर्णधार असताना मुंबईने अनेकदा कमबॅक केले आहे, पण हार्दिकच्या नेतृत्वात कमबॅक होईल का? याची चर्चा सुरु आहे.



रोहितला पुन्हा मुंबईचं कर्णधारपद देणार, अशा चर्चेला जोर धरला आहे. यामध्येच आता माजी खेळाडूच्या वक्तव्यानं खळबळ माजली आहे. राजस्थानविरोधातील सामन्यानंतर एका क्रिकेट कार्यक्रमात मनोज तिवारीने मुंबईच्या कर्णधारपदावर मोठा दावा केला. तिवारीच्या मते रोहितकडे पुन्हा एकदा मुंबईच्या संघाची धुरा जाऊ शकते. हार्दिक आयपीएलच्या मध्यात रोहितकडे कर्णधारपद सोपवेल.

## रोहितचा विक्रम

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

आयपीएलच्या इतिहासात सर्वाधिक वेळा शून्यावर बाद झालेल्या फलंदाजांच्या यादीत रोहित शर्मा दिनेश कार्तिकसह अव्वल स्थानावर पोहोचला आहे. अशाप्रकारे मुंबई इंडियन्सच्या माजी कर्णधाराच्या नावावर एक नकोसा विक्रम नोंदवला गेला आहे. आतापर्यंत, रोहित शर्माशिवाय, दिनेश कार्तिक आयपीएलच्या इतिहासात १७ वेळा शून्यावर बाद झाला आहे. यानंतर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा फलंदाज ग्लेन मॅक्सवेल आहे. आतापर्यंत ग्लेन मॅक्सवेल विक्रमी १५ वेळा शून्यावर पॅव्हेलियनमध्ये पोहोचला आहे.

# आयपीएलच्या दोन सामन्यांच्या तारखा बदलल्या

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

यंदा पण आयपीएल २०२४ चा थरार भारतात अतिशय भव्य पद्धतीने खेळवला जात आहे. चाहत्यांना दररोज रोमांचक सामने पाहायला मिळत आहेत. आधी बीसीसीआयने आयपीएल २०२४ च्या पहिल्या टप्प्याचे वेळापत्रक जाहीर केले होते. त्यानंतर सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्यानंतर दुसऱ्या टप्प्याचे वेळापत्रकही जाहीर करण्यात आले. पण बीसीसीआयने आता आयपीएल २०२४ च्या मधल्या वेळापत्रकात बदल केला आहे. दोन सामन्यांच्या तारखांमध्ये बदल करण्यात आला आहे.

- कोलकाता वि. राजस्थान १६ एप्रिल रोजी
- गुजरात वि. दिल्ली १७ एप्रिल रोजी

कोलकाता नाईट रायडर्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यातील सामना १७ एप्रिल रोजी कोलकात्याच्या ईडन गार्डन्सवर खेळवला जाणार होता, परंतु आता हा सामना १६ एप्रिल रोजी होणार आहे. याशिवाय गुजरात टायटन्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यातील सामना १६ एप्रिल रोजी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियम वर होणार होता, जो आता १७ एप्रिल रोजी खेळवला जाईल. या दोन सामन्यांमध्येच बदल झाले आहेत.

## मुंबईला गेम चेंजरची उणीव

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

हार्दिकच्या नेतृत्वाखाली खेळत असलेल्या मुंबईला सलग तीन पराभव पत्करावे लागलेत. मुंबईच्या टॉप ऑर्डरच्या फलंदाजांच्या कामगिरीबद्दल बोलताना गावसकर म्हणाले, 'मुंबईला नक्कीच सूर्यकुमार यादवची उणीव भासत आहे. सूर्यकुमार तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करतो आणि तो खूप चांगल्याप्रकारे पलटवार करु शकतो. परंतु, तो यावेळी उपलब्ध नाही. मुंबईची टीम प्रार्थना करत असेल की तो लवकर बरा होऊन खेळण्यासाठी उपलब्ध व्हावा. कारण तो सामन्यात मोठा फरक निर्माण करू शकतो. तो एक गेम चेंजर आहे.

# महाराष्ट्राची दुहेरी मुकुटाला गवसणी

## पुरुषांमध्ये ३९वे, तर महिलांमध्ये २५वे जेतेपद




**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

महाराष्ट्राच्या दोन्ही (पुरुष व महिला) संघांनी राष्ट्रीय खो-खो स्पर्धेमध्ये अपेक्षेप्रमाणे कामगिरी करताना अजिंक्यपदावर मोहोर उमटवली. महाराष्ट्राच्या पुरुषांच्या संघाने रेल्वे संघावर, तर महाराष्ट्राच्या महिला संघाने भारतीय विमान प्राधिकरण संघावर विजय साकारत झळाळता करंडक पटकावला. पुरुषांचे हे ३९ वे, तर महिलांचे २५ वे जेतेपद ठरले.

नवी दिल्ली येथील करमाळी सिंग क्रीडांगण येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राने डबल धमाका केला. गेल्या काही वर्षांतील रेल्वेचा दबदबा या वर्षी महाराष्ट्राने मोडून काढला. महिला विभागातील अंतिम सामन्यात महाराष्ट्राने भारतीय विमान प्राधिकरणावर ३.२० मि. राखून सहज दोन गुणांनी पराभव केला. महाराष्ट्राच्या प्रियांका इंगळे (२.२०, २.२० मि. संरक्षण व ४ गुण), संपदा मोरे (१.१०, १.४० मि. संरक्षण), अश्विनी शिंदे (२.१०, १.१० मि. संरक्षण व ४ गुण), काजल भोर (६ गुण) यांनी छान खेळ केला.

### रंगतदार सामन्यांत सरशी

पुरुषांच्या अंतिम सामन्यात शेवटच्या क्षणापर्यंत रंगलेल्या खेळात महाराष्ट्राने पारंपरिक प्रतिस्पर्धी रेल्वेचा ५२-५० पराभव केला. महाराष्ट्राला जादा डावात विजयासाठी १० गुणांची गरज होती. डाव संपण्यासाठी एक मिनीट शिल्लक असतानाच महाराष्ट्राला जिंकण्यासाठी एक गुणाची गरज होती. शेवटचे दोन सेकंद असताना गडी बाद करत महाराष्ट्राने रेल्वेवर मात केली.

## विश्वचषकापूर्वी इंग्लंडला धक्का

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयसीसीटी-२० विश्वचषक २०२४ या स्पर्धेला आयपीएल नंतर १ जूनपासून सुरुवात होणार आहे. याआधी इंग्लंड संघाला मोठा धक्का बसला आहे. कारण स्टार अष्टपैलू खेळाडू बेन स्टोक्सने विश्वचषक स्पर्धेतून आपले नाव मागे घेतले आहे. यामुळे करोडो चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. इंग्लंड क्रिकेट बोर्डाने एक निवेदन जारी करून म्हटले आहे की, इंग्लंडचा क्रिकेटपटू बेन स्टोक्सने आज पुष्टी केली आहे की, जूनमध्ये होणाऱ्या आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषकापूर्वी निवडीसाठी त्या नाव विचारात घेतले जाणार नाही.

# हार्दिक पांड्याची भावनिक पोस्ट

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

आयपीएल २०२४च्या हंगामाची सुरुवात मुंबईइंडियन्ससाठी काही खास झालेली नाही. नवा कर्णधार हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखाली संघाने पराभवाची हॅट्ट्रिक केली आहे. घरच्या मैदानावर राजस्थानविरुद्धच्या पराभवानंतर मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्याने एक भावनिक पोस्ट शेअर केली आहे. सलग दोन पराभवानंतर मुंबईचा संघ विजयाच्या आशेने घरच्या मैदानावर वानखेडेवर उतरला होता. पण राजस्थानच्या संघाने यजमान मुंबईला त्यांच्या घरात पराभव केला. या पराभवाने हार्दिकच्या जखमेवर मीठ चोळले आहे. कारण रोहितच्या जागी हार्दिककडे मुंबईचे कर्णधारपद सोपवण्याचा वाद अजूनही थांबलेला नाही.

पांड्याने एक्स या सोशल मीडिया हँडलवर एक पोस्ट शेअर केली आहे, ज्यामध्ये लिहिले की, 'या संघाबद्दल तुम्हाला एक गोष्ट माहित असली पाहिजे, ती म्हणजे आम्ही कधीही हार मानणार नाही. त्यामुळे आम्ही लढत राहू आणि पुढे जात राहू.' कर्णधार हार्दिकचे लक्ष आगामी सामन्यांवर आहे.

# चॅम्पियन्स लीग पुन्हा सुरू करणार?




**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

इंडियन प्रीमियर लीगच्या यशानंतर सध्या जगभरात अनेक टी-२० क्रिकेट लीग खेळल्या जात आहे. आंतरराष्ट्रीय सामने खेळण्याबरोबरच खेळाडू या लीगमध्येही भाग घेतात. दरम्यान, काही वर्षाआधी चॅम्पियन्स लीग आयोजित करण्यात आली होती, जी टी-२० फॉरमॅटमध्ये खेळली जात होती. मात्र, काही वेळाने ते थांबले. पण आता बातम्या येत आ-हेत की, चॅम्पियन्स लीग स्पर्धा पुन्हा सुरू होऊ शकते. यासाठी भारतीय क्रिकेट बोर्ड म्हणजेच बीसीसीआय, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड बोर्ड एकमेकांशी बोलत आहेत.

ही चॅम्पियन्स लीग सुमारे दहा वर्षांपूर्वी बंद झाली होती. २०१४ मध्ये शेवटचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ३ आयपीएल संघांनी यात भाग घेतला होता. आणि अंतिम फेरीत चेन्नई सुपर किंग्ज आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात चुरशीची लढत झाली. मात्र, अखेरीस सीएसकेने बाजी मारली. त्या वर्षी भारताचे तीन, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेचे प्रत्येकी दोन आणि पाकिस्तान, वेस्ट इंडिज आणि न्यूझीलंडचे प्रत्येकी एक संघ यात सहभागी झाले होते.

गेल्या दहा वर्षांत आणखी अनेक देशांतर्गत टी-२० लीग सुरू झाल्या आहेत. दरम्यान, क्रिकेट व्हिक्टोरियाचे सीईओ निक कमिन्स म्हणाले की, अशा व्यस्त क्रिकेट कॅलेंडरमध्ये चॅम्पियन्स लीगसाठी विंडो तयार करणे हे सर्वात मोठे आवाहन आहे.

पंधरावे पुण्यस्मरण



स्व. सौ. उषा जयवंत पाटील

जन्म दि. १३-६-१९६९ मृत्यू दि. ०३-०४-२००९

शब्दांतून दु:ख व्यक्त करता आले असते
तर अश्रूंची गरज भासली नसती
सर्व काही शब्दांत सांगता आले असते तर
भावनांची किंमतच उरली नसती

शोकाकुल
पती-जयवंत, बहिण- सौ. दिप्ती (दिपा), मुलगी- प्रिती,
मुलगे- आविष्कार व अथर्व, सासू- श्रीमती लिलाबाई,
जाऊ- सौ. अंजना, भाऊ - श्री. उदय म्हात्रे, जावई - श्री.
अमृत भोईर, मैत्रीण- सौ. मालती, सर्व पाटील परिवार
आणि मित्र परिवार
मु. रांजणखार, ता. अलिबाग, जि. रायगड

# संदीप पाटील यांची बैलगाडी ठरली विजेती

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षाचे चौल, नागांव, रेवदंडा विभागीय चिटणीस सचिन राऊळ यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत नागांव विभाग बैलगाडी, घोडागाडी मालक संघाच्यावतीने नागांवमधील साताड बंदर येथे बैलगाडी, घोडागाडी शर्यतीचे आयोजन मंगळवारी (दि.०२) करण्यात आले होते. या स्पर्धेत संदीप पाटील यांच्या बैलगाडीने विजय मिळविला. त्यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.







यावेळी सचिन राऊळ पुरस्कृत बैलगाडी व घोडागाडी शर्यतीचे उद्घाटन नागांवचे माजी सरपंच नंदकुमार मयेकर, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक, संदेश नाईक, नागांव घोडागाडी, बैलगाडी संघटना कमिटीचे पदाधिकारी, सभासद, बैलगाडी हौशी, प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या स्पर्धेत २५ गटांचा समावेश असून २३ बैलगाडी व दोन घोडागाडी गटांचा समावेश होता.

सायंकाळी अंतिम स्पर्धा पार पडली. यात संदीप पाटील यांच्या बैलगाडीने प्रथम क्रमांक मिळविला असून सदीकले बंधू यांच्या बैलगाडीने द्वीतीय आणि मनोहर ठाकूर यांच्या बैलगाडीने तृतीय क्रमांक मिळविला. बैलगाडीच्या मालकांना आकर्षक बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)